# शैक्षणिक दृष्टिकोण

म. ग्रं. सं. ठाणे १३६२
विषय
सं. क्र.

प्रा. चंद्रकुमार डांगे

१९६२

RFBK-0012343

किंमत १ रुपया

जोशी आणि लोखंडे प्रकाशक, टिळक-रस्ता, पुणें २.

[redacted]

# शैक्षणिक दृष्टिकोण

शिक्षणप्रसार
साहित्य-प्रकाशन
आणि
ग्रंथालयें याच्या
परस्परसंबधाची चर्चा.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 32629 वि: निबंध
क्रमांक 1892 नों. दि. 2/10/62

RFFBK-0012343

किंमत एक रुपया

प्रा. चंद्रकुमार डांगे
एम्. ए., एम्. ईडी.

12363

जोशी आणि लोखंडे प्रकाशन, पुणें २.

२६ जानेवारी १९६२

प्रकाशक :
दे. श्री. जोशी व म. द. लोखंडे,
जोशी आणि लोखंडे प्रकाशन,
सदाशिव पेठ, टिळक रस्ता, पुणें २

मुद्रक
प्र. भा काळे,
प्रतिभा मुद्रणालय,
सदाशिव पेठ, टिळक रस्ता, पुणें २

लोक ग्रंथ संग्रहालय ठाणे, स्थलमत
अनुक्रम 32621 वि निबंध
क्रमांक 9793 नों. दि. 8/10/62

## प्रयोजन

१५ ऑगस्ट १९४७ सालीं भारत स्वतंत्र झाल्यावर आपल्या शिक्षण-प्रसाराच्या कार्याला एक अननुभूत अशी गति प्राप्त झाली. समाजवादी समाज-रचनेचें ध्येय साकार करण्यासाठीं शिक्षणालाहि आपला वांटा उचलावा लागेल. नव्हे शिक्षण ही एक सुप्त क्रांति ( Silent Revolution ) हें कार्य करू शकेल. शिक्षणप्रसाराच्या कल्पनेंतहि दोन पातळया असतात. एक म्हणजे निरक्षर व्यक्तीला साक्षर करणें ही एक आणि दुसरी पातळी म्हणजे अशा नव-साक्षराना व एका विशिष्ट प्रकारचें, मग तें प्राथमिक, माध्यमिक किंवा विद्यापीठीय, तांत्रिक किंवा व्यावसायिक शिक्षण घेतलेल्यांना समाज–शिक्षणाद्वारें आपलें व्यक्तित्व विकसित करण्यास सहाय्य करणें. अर्थातच या पातळया साचेबदपणें अलग राहू शकत नाहींत. या कार्यांत शिक्षक, ग्रथालयें आणि सरकार यांच्या भूमिका कोणत्या, त्याचीं कार्यक्षेत्रें कोणतीं हे फार महत्त्वाचे प्रश्न निर्माण होतात. आजवर या तीनहि घटकांसबधीं अवलंबिलेलें धोरण, रूढ परपरा योग्य आहेत काय, कोणत्या घटकाची कुचंबणा झाली आहे, कोणावर जास्त ताण पडला आहे व कोणी आपलें क्षेत्र अतिव्याप्त केलें आहे याचा पुनर्विचार करण्याची नितात गरज भासू लागली आहे. तो विचार या पुस्तकात मांडलेला आहे.

महाराष्ट्र राज्यांतील शिक्षणासबधींचें या पुस्तकाच्या अखेरीस दिलेलें परिशिष्ट या शिक्षणप्रसाराच्या व्यापक व प्रचड कार्याची जाणीव निर्माण करू शकेल. या पायाच्या ( Basic ) शिक्षणात गळती ( Wastage ) आणि कुचंबणा ( Stagnation ) या दोन व्याधींनीं फार अडथळे आणले आहेत. त्याचा निरास करायचा असेल तर समाज-शिक्षणाचें कार्य कोणत्या एका केंद्राद्वारें करणें अगत्याचें आहे याचाहि विचार मांडलेला आहे.

समाज-शिक्षण म्हटलें कीं साहित्य, क्रमिक पुस्तकें यासबधींचे जसे प्रश्न निर्माण होतात, तद्वतच युवकांच्या व्यक्तित्वाच्या सगोपनाचाहि प्रश्न येतोच. परिस्थिति अशी आहे कीं यासबधींचे आपले प्रयत्न फार तोकडे वाटत आहेत. शिक्षणप्रसाराबरोबरच ज्या अन्य घटकांनीं महाराष्ट्राच्या जीवनात नव्या प्रेरणा

निर्माण केल्या आहेत, नव्या आकांक्षा रूजू घातल्या आहेत त्यांना मार्गदर्शन करून समाजाभिमुख करण्याचें कार्य जर आपल्या शिक्षणानें केलें नाहीं तर हे प्रयत्न वाया जाण्याचा धोका आहे. उद्यांच्या, जनतेंतून निर्माण होणाऱ्या नेतृत्वासाठीं एक विशिष्ट शैक्षणिक दृष्टिकोण ठेवून योजना आंखणें अगत्याचें आहे. तो दृष्टिकोण या पुस्तकांत मांडलेला आहे.

कोल्हापूर जिल्ह्यांतील श्री **मौनी विद्यापीठाच्या**, परुळेकर ग्रंथालयाच्या वर्धापन दिनानिमित्त भाषण करताना हे विचार प्रकट करण्याची संधि मला लाभली. कै परुळेकराच्या स्मृतीला आदरांजली वहाण्याचा योग अशा शिक्षण-विषयक विचाराच्या प्रकटनानें जुळून यावा ही मोठी सूचक घटना आहे. महाराष्ट्रातील शिक्षणक्षेत्राशीं निगडित असलेले शिक्षक आणि या विषयात रस घेणारे वाचक याच्यासमोर हा दृष्टिकोण मी नम्रपणें सादर करीत आहें.

गारगोटीच्या श्री मौनी विद्यापीठाच्या प्रवाचार्यांची, माझे ज्येष्ठ स्नेही, प्रतिभा मुद्रणालयाचे चालक श्री. नानासाहेब जोशी यांची सक्रिय प्रेरणा होतीच. मग हें सारें प्रकाशित करण्याचा योग केवळ त्यांच्यामुळें सफल झाला. हें कृतज्ञतेनें नमूद केल्याशिवाय हें प्रयोजन पूर्ण होणार कसें ?

चंद्रप्रभा
विजयानगर कॉलनी,
पुणें २.

चंद्रकुमार डांगे

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम २३६२९ वि: विविध
क्रमांक १०९२ नों. दि. २/१०/६२

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. ९२३८३
[illegible]

# शैक्षणिक दृष्टिकोण

रुखरुख

आपल्या देशांतील शिक्षणपद्धतीबद्दल वाटणारी रुखरुख ही सर्व जगांतील देशांत शिक्षणाबद्दल व्यक्त होणाऱ्या रुखरुखीसारखीच आहे. पहिल्या महायुद्धापासून शिक्षणाच्या पुनर्घटनेला एक वेगळी कलाटणी साऱ्या जगांत मिळाली. दुसऱ्या महायुद्धानंतर तर सारें शैक्षणिक जग आमूल ढवळून निघालें. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतानें सार्वत्रिक, सक्तीच्या आणि मोफत शिक्षणयोजनांचा प्रसार अग्रहक्कानें पुरस्कारला, यांत नवल

नाहीं. कारण शिक्षणप्रसार, तदनुषंगिक साहित्य-प्रकाशन, हें साहित्य प्रसृत करणारीं ग्रंथालयें आणि समाजशिक्षण यांच्या परिणामकारक आयोजनाखेरीज आपली नवजात लोकशाही स्थिर होणार नाहीं अशी सर्वांचीच धारणा आहे पण या साऱ्या प्रयत्नामागें एक निश्चित दृष्टिकोण हवा. आपल्या कल्पना तावूनसुलाखून घेण्याची प्रयोगशील वृत्ति हवी, जगांतील इतर देशांचा अनुभव जमेस धरण्याचा सावधपणा हवा. अशी काळजी मात्र न घेतल्याची रुखरुख तीव्र होत आहे. ही तीव्रता भासते याचें कारण म्हणजे आज भारतीय शिक्षणक्षेत्रांत निर्माण झालेली वैफल्याची गडद भावना. ही भावना जर नष्ट करायची असेल तर **प्राथमिक शिक्षणाचा प्रसार, ग्रंथालयें** आणि **साहित्य-प्रकाशन** यासंबंधीं एक दृढ असा दृष्टिकोण स्वीकारून तो अमलांत आणणें अगत्याचें आहे. अशा प्रकारचें वैफल्य सतत राहूं देणें हितकारक ठरणार नाहीं, या जाणिवेनें या व्यापक विषयाचा, महाराष्ट्राच्या दृष्टीनें प्रपंच करण्याचा हा प्रयत्न आहे. दृष्टिकोण सांगण्याइतपतच विवेचन मर्यादित केलेलें आहे हें स्पष्ट करणें आवश्यक आहे

## विषयाची व्यापकता

विषयाचें नुसतें शीर्षक पाहिलें तरी त्यातील व्यापकतेची कल्पना सहज येऊं शकेल. गंमत अशी कीं, या विषयातील दोन केंद्रें शिक्षणाशीं निगडित झालेलीं आहेत, आणि एक तर प्रत्यक्ष शिक्षणाचें क्षेत्रच आहे. शिक्षणाची जीवनस्पर्शी व्याख्या आपण पत्करलेली आहे. संकुचिततेच्या मर्यादेतून आपण बाहेर पडलों आहोंत. प्राथमिक शिक्षणाच्या प्रसाराच्या प्रश्नाबरोबरच आपण साहित्य-प्रकाशन आणि ग्रंथालयें याचा आवर्जून विचार करीत आहोंत, हीच त्या व्यापकतेची साक्ष आहे. अगदीं बारकावा स्पष्ट करावयाचा असेल तर साहित्य-प्रकाशन आणि ग्रंथालयें यांना शिक्षणाचीं अनौपचारिक साधनें ( informal agencies ) म्हणूं आणि

प्राथमिक शिक्षण हें औपचारिक शिक्षण ( Formal Education ) असें म्हणता येईल. या दोन्ही मार्गांच्या सीमारेषा परस्परांत इतक्या मिसळून गेलेल्या आहेत कीं, त्यांना एक प्रकारें अन्योन्याश्रयाचें, एकमेकांवर अवलंबून असणारें असें स्वरूप आलेलें आहे. वाचनाची किमया व्यक्तीला साध्य झाली कीं, ग्रंथालयाचे दरवाजे उघडे होतात आणि ग्रंथालयाना समृद्ध करणाऱ्या साहित्याचा प्रकाश जाणवूं लागतो. असें असलें तरी या प्रत्येक अंगाचें स्वरूप, त्याच्या मर्यादा, त्याचे स्वत चे असे प्रश्न व समस्या आहेतच. हा त्रिवेणी संगम दूरवरून पहायला चित्ताकर्षक वाटतो ! प्रत्यक्ष प्रवाहांत अनंत भोंवरे आहेत, उथळ-खोल जागा आहेत आणि दमछाक करून टाकणाऱ्या लाटाहि आहेत. या साऱ्या विस्ताराचा आज आपण विचार करूं. तो आपल्या महाराष्ट्राच्या संदर्भांत म्हणजे थोडा आटोप होऊन आपल्याला मूलभूत असा विचार करतां येईल.

लोकशिक्षणाचे मार्ग

भारतांतील लोकवस्तीच्या शेंकडा ९ टक्क्यांहून अधिक लोकवस्तीच्या आपल्या नवजात महाराष्ट्र राज्यात ३॥ कोटींहून अधिक लोक राहातात. २६९ शहरें आणि ३५,५०७ खेडेगांवांतून ही लोकवस्ती पसरलेली आहे. ५०० हून कमी लोकवस्ती असलेलीं खेडेगांवें २०,०२८ आहेत. शेंकडा ६३·९७ टक्के लोक शेती करणारे आहेत. लोकवस्तीच्या मानानें साक्षरता फक्त २९·७ टक्के आहे. म्हणजे साक्षरतेचा प्रचंड प्रश्न आपल्यासमोर येऊन थडकतो आणि भयचकित करतो. या व्यापक पण मूलभूत प्रश्नाची सोडवणूक करण्यासाठीं आपण पुढील मार्गांचा अवलंब केलेला आहे.

१. ६ ते १४ वर्षे वयाच्या मुलांना सक्तीचें, सार्वत्रिक, मोफत शिक्षण.

२ समाजशिक्षणाच्या द्वारें प्रौढांचा सर्वांगीण विकास करणें.

३. ग्रंथालयांचे जाळें साऱ्या महाराष्ट्रभर विणणें.

निराळ्या शब्दांत या प्रयत्नांचें वर्णन करायचें म्हटलें तर, भारतानें स्वीकारलेल्या लोकशाही जीवन-पद्धतीच्या रचनेची पायाभरणी आपण करीत आहोंत. समाजवादी समाजरचनेचें हें आपलें अधिष्ठान आहे. किंबहुना आपल्या लोकशाही जीवनपद्धतीच्या अंतिम सफलतेचें गमक म्हणचेच या प्रयत्नांना लाभणारें यश होय

टिकाऊ साक्षरता

शाळेंत जाणारा विद्यार्थी जर ओळीनें चार वर्षे लिहिण्यास आणि वाचन करण्यास शिकला तर त्याची साक्षरता टिकण्याची शक्यता फार असते. पण तरीहि त्याला सतत वाचनासाठीं साहित्य पुरविण्याचा प्रश्न उभा राहतोच. समाजशिक्षणाच्या क्षेत्रांत तर हा प्रश्न अधिक निकडीनें जाणवूं लागतो. साक्षरतेची मोहीम केवळ आंकड्यांच्या, संख्यात्मकतेच्या दृष्टीनें मापून चालणार नाहीं. तर ती साक्षरता टिकून कशी राहील हा फार मोठा प्रश्न आहे. मला वाटतें या ठिकाणीं थोडेंसें दुर्लक्ष झाल्यासारखें दिसतें. सरकारनें टिकाऊ साक्षरतेसाठीं आपले प्रयत्न अधिक बळकट केले पाहिजेत. नवसाक्षर झालेल्या व्यक्तीच्या जीवनांत असे प्रसंग हरघडी येतात कीं, ज्या वेळीं तो आपल्या वाचनाचा उपयोग करूं शकेल. पावती घेणें, देणें. वर्तमानपत्रें, नोटिसा, जाहिराती, वार्ताफलक असे कितीतरी मार्ग आहेत कीं, ज्यायोगें वाचनाची क्रिया जिवंत राहूं शकेल; पण खरा प्रश्न आहे तो असा कीं, असें अर्थपूर्ण वाचन त्याच्या जीवनांत घडतें काय ! केवळ अंगठा उठविण्याच्या ऐवजीं ती व्यक्ति सही करूं लागली हें कांहीं खरें यश नाहीं. अर्थपूर्ण वाचन होऊं शकतें काय, हा खरा प्रश्न आहे. नेमक्या याच ठिकाणीं उणीव भासते ती अशा नव-साक्षरांच्या हातीं अवश्य असणाऱ्या साहित्याची. हें साहित्य स्वत: तयार करणें हें सरकारचें काम नाहीं. असलेंच तर त्याला फार मर्यादा

येतील व तें पुरें पडणार नाहीं. याच ठिकाणीं खासगी प्रकाशक आणि लेखक यांचें योग्य साहित्य घेऊन तें नवसाक्षरांना भरपूर प्रमाणांत पुरविणें हें खरें सरकारचें कार्य आहे. हें कार्य जर अंगीकृत केलें गेलें नाहीं तर साक्षरतेची किंवा ग्रामशिक्षणाची मोहीम पूर्णतया यशस्वी कशी होईल ? या दोन्ही मोहिमांचें आयोजन ज्या उत्साहानें चाललें आहे तें सदासर्वदा स्वागतार्ह आहे. पण या योजनेला सातत्य लाभून त्याचीं गोड फळें पदरीं पडायचीं असतील तर आपल्याला एका प्रश्नाचें उत्तर शोधून मगच पुढें जायला तयार झालें पाहिजे.

### ग्रंथालयाचें अपूर्व स्थान

या साऱ्या प्रयत्नांना गति देणारें, स्वयंचलित ठेवणारें (automatic) आणि सतत नवजीवन देणारें असें एक केंद्र आहे काय, असा जर कोणी प्रश्न निर्माण केला तर माझ्यापुरतें उत्तर मी असें देईन कीं, होय. असें एकमेव केंद्र जर कोणतें असेल तर तें ग्रंथालय होय ! कै. न. चिं. केळकर यांनीं एका प्रसंगीं काढलेले उद्गार सदैव चिंतनीय आहेत. साहित्य-सम्राट् केळकर असें म्हणाले कीं, क्रांतीच्या लढाया जरी रणांगणावर लढल्या गेल्या तरी त्यांचा जन्म होतो वाचनालयांतच ! फार फार अर्थपूर्ण उद्गार केळकरांनीं काढले. जगाच्या आजच्या परिस्थितीच्या संदर्भांत तर ते विशेष लक्षणीय आहेत. आजची लढाई म्हणजे मानवाचा विनाश होय. भारत तर शांततामय सहजीवनचा उद्गाता आणि आपल्या माहेर-घरीं सर्वंकष परिवर्तनांत गढून गेलेला. रूढी, परंपरा, पूर्वग्रह, जाती अर्थव्यवस्था, धर्म अशा शेंकडों जीवनांगांचें परिवर्तन करण्यासाठीं आपण बद्धपरिकर झालेलों आहोंत. हें परिवर्तन करण्याचें सामर्थ्य साहित्य आणि त्याचें संगोपन करणाऱ्या ग्रंथालयांतच आहे. A Review of Education in the Bombay State 1855–1955 ( १८५५ ते १९५५ या शंभर वर्षांतील मुंबई राज्यांतील शिक्षणाचा आढावा ) या ग्रंथांत Other Educational Activities ( इतर शैक्षणिक चळवळी )

अशा शीर्षकाखालीं ग्रंथालय-चळवळीची नोंद करण्यांत आली असली तरी ग्रंथालय हाच खराखुरा शिक्षणाचा प्राण आहे. प्राथमिक शिक्षणापासून तों विद्यापीठीय शिक्षणापर्यंत ग्रंथालयानेंच खरेंखुरें विचारपरिवर्तन होत असतें. अभ्यासासाठीं नेमलेलीं क्रमिक पुस्तकें हीं अखेर साधनेंच राहातात. पण ग्रंथालयांतील एक पुस्तक सारें जीवन व्यापून टाकण्यास समर्थ होतें. मग तीं एखादी ॲलिस इन् वंडरलँड् सारखी परिकथा असो कीं मार्क्सचें कॅपिटल् असो ! राष्ट्रपिता गांधीजींनीं, त्यांचें सारें जीवन आमूलाग्र बदलून टाकणारी शक्ति म्हणून उल्लेख केला तो एका ग्रंथाचाच. तें पुस्तक म्हणजे The Crown of Wild Olive हें रस्किन्चें पुस्तकच होय. १९५४-५५ सालचे ग्रामीण ग्रंथालयासंबंधीचे आंकडे असें सांगतात कीं, या सालांत ग्राम-ग्रंथालयें व वाचनालयें ५,९७८ होतीं व सरकारनें १,५५,४९४ रुपयांचीं अनुदानें त्या वर्षी दिलीं. तालुका आणि पेटा यांमधील ग्रंथालयांचा १९५४-५५ मध्यें ९६,१४२ लोकांनीं प्रत्यक्ष वाचन करून लाभ घेतला व ५४,४८,२८८ लोकांनीं नुसती भेट दिली ! आपल्या महाराष्ट्रांतील खेडेगांवांची संख्या आणि हे वाचकांचें प्रमाण पाहिलें तर मनांत फार कालवाकालव होते. पण शाळामधील ग्रंथालयांचें काय होतें ? मुलें काय वाचतात, किती वाचतात, कशी वाचतात, केव्हां वाचतात याचा हिशेब उपलब्ध आहे काय ? सुदैवानें एक गोष्ट मान्य केली पाहिजे कीं, ग्रंथालयाकडे पहाण्याचा दृष्टिकोण निवळत चालला आहे ग्रंथपालकाच्या भूमिकेचें महत्त्व अगदीं क्षीण का होईना पण पटूं लागलें आहे. परंतु ग्रंथांकडे मुलांना, मग तीं कोणतेंहि व कोणत्याहि दर्जाचें शिक्षण घेत असोत, कसें आकर्षित करायचें हा खरा मूलभूत प्रश्न आहे. या प्रश्नाच्या सोडवणुकींतील अनेक अडचणी आपणा सर्वांच्या परिचयाच्या आहेत. मी त्यांची यादी करीत बसत नाहीं किंवा ग्रंथपालानें काय करावें यासंबंधींच्या चिरपरिचित सूचनाहि उगाळत बसत नाहीं.

पण एका गोष्टीचा मात्र उल्लेख करावासा वाटतो. तो म्हणजे **ग्रामग्रंथालयें** आणि **सरकार** याचे परस्पर संबंध. समाजशिक्षणाच्या कार्यक्षेत्रात ग्रामग्रंथालयाचा अंतर्भाव केला जातो. ग्रामग्रंथालयावर शिक्षण-खात्याचें नियंत्रण असतें. विद्याधिकारी ( Director of Education ) आपल्या अधिकाऱ्यांच्या मार्फत ग्रामग्रंथालयांची व्यवस्था पहातात. या ग्रामग्रंथालयांना वार्षिक अनुदान रु. ७५ पर्यंत मिळण्याची व्यवस्था असते. अर्थातच ग्रामग्रंथालयाचा खर्च कसा केला जावा याचीहि एक पद्धति आहे. शें. ६० टक्के पुस्तकांवर, २० टक्के वर्तमानपत्रें आदींवर आणि उरलेल्या २० टक्क्यांत **संमत खर्च** ( Admissible Expenditure ) दिवाबत्ती, फर्निचर इ० बसवावयाचा. म्हणजे एखाद्या ग्रामग्रंथालयानें सुमारें २०० रुपये खर्च अशा पद्धतीनें केला तर सरकारी अनुदान रु. ७५ मिळूं शकेल. या ओढगस्तीच्या संसारांत, ग्रामग्रंथालयाचें जीवन कसें चाललें असेल याची कल्पना सहज करतां येईल. याचा परिणाम असा दिसून येतो कीं, या ग्रंथालयांत पुस्तकेंच नसतात. लोकांच्या मागणीप्रमाणें नियतकालिकांवर खर्च करणें अपरिहार्य ठरतें. दरवर्षी रु. ७५ चें अनुदान मिळविणारीं ग्रामग्रंथालयें अत्यल्प आढळलीं तर नवल नाहीं यामुळें ग्राम-ग्रंथालयाची सख्या मोठी दिसत असली तरी त्यांतील फारच थोडीं कार्यक्षम अशीं आढळतात. ही परिस्थिति बदलली गेली पाहिजे. समाज-शिक्षणाचें एक अंग म्हणून ग्रंथालयांकडे पाहिलें न जातां, ग्रंथालयच साऱ्या समाजशिक्षणाचें केंद्र ( Nucleus ) झालें पाहिजे. यासाठीं सरकारनें या ग्रामग्रंथालयांना भरपूर प्रमाणांत पुस्तकें पुरविलीं पाहिजेत. महाराष्ट्र राज्याचे क्युरेटर ऑफ लायब्ररीज जसें आपल्या यंत्रणेमार्फत पुस्तकें कोणतीं विकत घ्यावींत असे सुचवितात व मगच तीं पुस्तकें, जिल्हा, तालुका, भाग ( Region ) आदि ठिकाणचीं ग्रंथालयें घेतात तशी व्यवस्था व्हावी. फरक इतकाच कीं, ग्रामग्रंथालयांना कोणतीहि किंमत

न घेतां पुस्तकें पुरविलीं जावींत. या योजनेमुळें ग्रामग्रंथालयांचें नष्टचर्य संपेल आणि समाजशिक्षणाच्या मोहिमेला अधिक चिरस्थायी स्वरूप लाभेल. या कार्यांत खासगी प्रकाशकांचें साहाय्य मिळून, नव्या लेखकांनाहि एक विशाल क्षेत्र निर्माण होईल नव साक्षरांची साक्षरता घटवून पक्की करण्यासहि आवश्यक अशी मदत मिळेल. ग्रामग्रंथालयांचें पोषण ही आपल्या व्यापक शिक्षणाच्या कार्यांतील मूलभूत गोष्ट आहे. ग्रामग्रंथालयें जर संपन्न व्हावयाचीं असतील, तर त्यांना दिल्या जाणाऱ्या अनुदाना-बरोबर भरपूर अनुदान पुस्तकांचें मिळालें पाहिजे

एक लोकभ्रम

या मार्गांत जो एक लोकभ्रम एखाद्या अवाढव्य भिंतीसारखा उभा आहे त्याचा मात्र आवर्जून उल्लेख करतों. कारण त्याचा विपरीत परिणाम, प्रत्यक्षाप्रत्यक्षपणें शिक्षकांवर, ग्रंथपालांवर आणि विद्यार्थ्यांवर झालेला दिसतो. या लोकभ्रमाचें उगमस्थान म्हणजे आपण आपल्या सर्व शिक्षणावर टीका करीत असतांना काढीत असलेले उद्गार होत ! ते उद्गार असे कीं, 'आमचें शिक्षण पुस्तकी आहे'. शिक्षणासंबंधीं नेमलेल्या कोणत्याहि कमिटीचा, कमिशनचा अहवाल बघा. फार मोठा आक्रोश करून सांगितलें जातें कीं, सारें शिक्षण पुस्तकी झालें आहे, अनुभूतीला स्थान नाहीं, जीवनोपयोगी शक्ति नाहीं ! या टीकेचा परिणाम मात्र असा झालेला दिसतो कीं, ग्रंथालयाला जीवनांत महत्त्व नाहीं, ग्रंथाभ्यास निरुपयोगी आहे. टीका करणाऱ्यांच्या मनांत ग्रंथांची, वाचनाची किंवा ग्रंथालयांची उपेक्षा व्हावी असें नाहीं हें आवर्जून सांगतों. तसा हेत्वारोप करणें अन्यायाचें होईल. भारतीय शिक्षण जीवनो-पयोगी करणाऱ्या महात्माजींच्या वर्धा शिक्षणयोजनेच्या भाष्यांत देखील अशी उपेक्षा सूचित करणारा उद्गार नाहीं. गांधीजींच्या हातून असें घडणें त्रिवार असंभवनीय आहे. मग परिणाम असा विपरीत कां झाला ?

याची कारणमीमांसा झाली पाहिजे. १९३७ सालीं गांधीजींनीं मूलोद्योगी शिक्षणाची कल्पना मांडली व पुढें ती कार्यवाहीत आणली गेली. कृति प्रधान शिक्षणपद्धतीच्या या कार्यक्रमांत ग्रंथालय मात्र उपेक्षित राहिलें याला मुख्य कारण असें कीं, प्राथमिक शिक्षण महाविद्यालयांत प्रशिक्षण घेतांना किंवा प्रत्यक्ष शाळेंत अध्यापन करीत असतांना शिक्षकांचा फार वेळ तांत्रिक गोष्टी करण्यांत जाऊं लागला समवायाचें तंत्र आत्मसात् करण्यांत जितका वेळ गेला त्याच्या शतांशहि वेळ मननाला, चिंतनाला, वाचनाला देतां येणें अशक्य झालें ही वस्तुस्थिति आहे. याचा परिणाम शिक्षकांच्या दर्जावर न झाला तरच नवल. माध्यमिक शिक्षण महाविद्यालयांतहि हा शिक्षकांच्या अभ्यासाचा ( Academic level ) प्रश्न तीव्रतेनें जाणवूं लागला आहे. मूलोद्योगी शिक्षणामागील तात्त्विक भूमिका समजावून घेऊन त्यावर चिंतन, वाचन करण्यास शिक्षकांना सवडच मिळत नाहीं. म्हणजे शिक्षक दोन्ही दृष्टींनीं अपूर्ण राहातात. विषयांचें यथार्थ ज्ञान नाहीं व ते विषय ज्या भूमिकेवरून, ज्या तात्त्विक व ध्येयवादी दृष्टीनें अध्यापन करायचे त्याची समज नाहीं. अशा कात्रींत सांपडलेले शिक्षक मग केवळ तंत्राचे परिपालक होतात. मूलोद्योगामागील ध्येयवाद त्यांना वैचारिक दृष्टीनें देखील समजलेला नसतो व त्याची अंमलबजावणी मात्र अगतिक होऊन करीत राहतात. प्राथमिक शिक्षण महाविद्यालयांचा अभ्यासक्रम तपासून पाहिला तर त्यांत विषयांच्या अभ्यासासाठीं फक्त २०० गुण राखून ठेवलेले आढळतील. समाज-जीवन (Community living), वर्षभरांतील मूलोद्योग, मूलोद्योगाचा तात्त्विक अभ्यास ( Theory Examination in craft ), आनुषंगिक हस्तव्यवसाय ( Auxiliary craft ) वर्षांतील इतर काम अशा उद्योगांत शिक्षकाचा किती वेळ जात असेल हें विशद करून सांगायला नको. परिणामीं, टीपा-टिप्पणींचा आश्रय करून सर्वच अभ्यासाचे विषय उत्तीर्ण होण्याकडे कल होतो व शिक्षक वाचनाला, खऱ्या अभ्यासाला वंचित

राहातो मूलोद्योगाच्या हितासाठीं तरी ही अनवस्था बंद होणें अगत्याचें आहे. शिक्षणक्षेत्रांतील कांहीं विचारवंत असें म्हणतात कीं, शेती हा मूलोद्योग स्वीकारला तर, या प्राथमिक शिक्षणांतील अनवस्था संपेल. ज्या शाळानीं शेतीचा मूलोद्योग स्वीकारला आहे त्याचा अनुभव वस्तुनिष्ठ दृष्टीनें तपासून घेणें अगत्याचें आहे. वर्षभर प्रयोग करून, शास्त्रीय कसोट्यावर घासून हा बदल स्वीकारला पाहिजे. पण आज शेती मूलोद्योगावर चाललेल्या शाळांचाहि अनुभव, दर्जाच्या दृष्टीने उत्साहजनक नाहीं. तिथेंहि वाचनाचा, चिंतनाचा, अभ्यासाचा प्रश्न आहेच. सुताऐवजीं शेती इतका सोपा बदल करून अपेक्षित साधणें कठीण आहे. शेतींत समवायाला अधिक संधि ( possibilities ) आहेत हें म्हणणें केवळ वरवर स्वीकारून चालणार नाहीं येथेंहि समवाय आहेच. समवायाच्या क्षेत्रांतच दोन भिन्न क्षेत्रें केलीं पाहिजेत. ज्ञानाचें क्षेत्र सामर्थ्यशाली केल्याशिवाय केवळ कृतिमय समवाय टिकणार नाहीं त्यासाठीं ग्रंथाचीच कास धरली पाहिजे हें निर्विवाद.

ग्रंथाची अनुभूति क्षमता

'अनुभूतीद्वारा शिक्षण' या कल्पनेचा झालेला अपरिमित विपर्यास हें या अनवस्थेचें आदिकारण होय. ग्रंथ हे कोणत्याहि मूलोद्योगाइतकेच अनुभूतिक्षम असतात याचा पडलेला विसर होय. किती गुंड्या सूत काढावें, किती कापड विणावें, किती कातडकाम करावें, किती वेत वळावा, किती शेत नांगरावें, किती पिकवावें याचा काटेकोर तपशील असलेल्या अभ्यासक्रमांत आणखी किती पुस्तकें व कोणतीं वाचलींच पाहिजेत याचा मागमूस देखील नाहीं. उल्लेख फक्त आहे तो कांहीं क्रमिक पुस्तकाचा! या परिस्थितींत आजचे शिक्षक आणि विद्यार्थी वाचनापासून, चिंतनापासून वंचित झालेले आहेत हें वास्तव आहे त्यांच्या वाचनाला चमत्कारिक मर्यादा पडलेल्या आहेत. वाचनाची पातळीच फार

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत
अनुक्रम ३२६४७ वि: ...भोषण..
क्रमांक ...३८७३... नों. दि. ...


खालावली आहे. याचा दूरगामी परिणाम झाला आहे तो शिक्षकांच्या विद्यार्थ्यांच्या व्यक्तित्वावर ! ठराविक वर्तमानपत्रें, कांहीं मासिकें किंवा सामान्य ललित साहित्य यांच्या बाहेर काहीं वाचन घडतें असें दिसत नाहीं. या विरंगुळ्याच्या वाचनापलीकडे असें जें चिंतनशील ग्रंथांचें विशाल क्षेत्र आहे तें भकास, रितें वाटतें ! ग्रंथालयातील अशा पुस्तकांवरची धूळ देखील झटकली जात नाहीं. अशा अवस्थेंतच ग्रंथालयाचें पुस्तकें विकत घेण्याचें धोरण ठरविलें जातें व पर्यायानें ग्रंथालयाचा दर्जाहि उतरतो. ही उतरंड मोठी विचित्र आहे, भयावह अशा गर्तेत नेणारी आहे ! अशा ग्रंथांना वाचकच नसणें ही खरी ग्रंथांना लागणारी वाळवी आहे. या दुरवस्थेच्या मागोमाग आर्थिक काटकसर आहेच. 'कोणी वाचीत नाहीं मग पुस्तकें घ्या कशाला ?' या एका प्रश्नानें ग्रंथालयाचे सारे प्रश्न सोडविले जातात, असा सार्वत्रिक अनुभव आहे. प्राथमिक शाळांतून ग्रंथालयाची गरज तरी काय आहे, असा प्रश्न फार पूर्वी एका अधिकारारूढ व्यक्तीनें विचारल्याची सत्यकथा सुपरिचित आहे. मग ग्रंथालयाला देखील शोभेचें अगतिक रूप येतें ग्रामीण भागांत तर ग्रंथालयाचें स्वरूप किती भयप्रद होत असेल याची कल्पना सर्वांना परिचित आहे. आपणच त्या वेदना अधिक जाणू शकता. वाचक नाहींत म्हणून फूटपाथवर आलेलीं ग्रंथालयांतील पुस्तकें मी पाहिलीं आहेत, आपणहि पाहिलीं असतील एखाद्या घरांतील जुनीं, क्वचित् दुर्मिळ पुस्तकें रद्दींतून बाजारात येतात, तींच कोणत्यातरी ग्रंथालयासाठीं घेतलीं जातात, तेथून पुन्हां तीं वाचक नाहीं म्हणून फूटपाथवर येतात ! एखादें खोटें नाणे जसें भराभर फिरतें तसें पुस्तकांचें होतें.

नेतृत्वाची वाण

मित्रहो, याचा परिणाम केवळ शिक्षणक्षेत्रातच होतो असें नव्हे, तर शिक्षणाभोंवतीं व्यापून असणाऱ्या व्यापक समाजजीवनावरही होतो

आणि त्याची झळ लागते ती आमच्या छोट्यामोठ्या गांवांतील नेत्यांना. स्थानिक नेतृत्व, मग तें गांवांतील असो, तालुक्यातील असो, जिल्ह्यांतील असो, हें बलशाली कसें होईल याच्या व्यापक सामाजिक चर्चेत मी शिरत नाहीं, त्या चर्चेचें हें स्थळ नव्हे. पण या नेतृत्वाचा प्राण म्हणजे व्यासंग, विचारशीलता, चिंतनप्रवृत्ति तीच किती अपंग आहे तें पहा हें नेतृत्व विचारप्रवर्तन करूं शकत नाहीं. तें कोणत्यातरी राजकीय विचाराचें भारवाहक साधन बनलेलें आहे. आणि आतां तर आपण विकेंद्रीकरणाच्या उंबरठ्यावर—नव्हे प्रवेशद्वारीं उभे आहोंत. ग्रामपंचायती, जिल्हा-परिषदा आतां कारभार करूं लागणार आहेत. प्रयोग नवीन आहे. लोकशाहीचें अमृत अगदीं समाजाच्या मुळावर सिंचन करण्याचा हा पुरोगामी प्रयत्न आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांचा शंभराहून अधिक वर्षांचा इतिहास कंठरवानें ओरडून सांगतो आहे कीं, या व अशा प्रकारच्या संस्थांतून नेतृत्व निर्माण झाले नाहीं नेतृत्वनिर्मितीच्या शाळा, या संस्था होऊं शकल्या नाहींत.

हा विचारांचा म्हणजेच वाचनाचा कणा मोडल्यावर इतर अप-प्रवृत्तींचा विजय झाला तर नवल नाहीं. यामुळेंच आपलें खेडेगांवांतील, तालुक्यांतील, जिल्ह्यांतील, लहानशा गावांतील सारें सामाजिक जीवन अपप्रवृत्तींनीं विकल झालेलें, तर पुढारलेल्या शहरांतील जीवन विलक्षण बेफिकिरीनें, अहंतेनें ग्रासलेलें दिसतें. मग असलें दुबळें सामाजिक नेतृत्व सारा भार देऊं लागतें तें राजकारणावर म्हणजे सत्तेच्या राजकारणावर अशाच नेतृत्वाच्या पंखाखालीं साक्षर, निरक्षर, प्रौढ, तरुण स्त्री-पुरुष वावरूं लागतात. युवकांना असलेंच नेतृत्व कोणत्या तरी मोहजालांत गुरफटून टाकतें. आपल्या देशांतील साऱ्या युवक-संघटना विविध राजकीय पक्षांच्या आहारीं राहिलेल्या दिसतात त्याचा दुसरा अर्थ काय? युवकांना मार्गदर्शन करण्याचे आपले प्रयत्नहि सूत्रबद्ध नाहींत. प्राथमिक शाळेपासून तों महाविद्यालयापर्यंत एका सूत्रानें सारी योजना आंखून

नेतृत्वनिर्मितीचे कार्य हातीं घेणें ही अत्यंत आवश्यक गरज आहे. आज आपल्या साऱ्या अभ्यासानुवर्ति चळवळी विफल ठरत आहेत, त्याचें प्रमुख कारण म्हणजे या चळवळींच्यामध्यें शिक्षकाची जी खरी भूमिका तिचाच विसर पडलेला आहे. प्राथमिक कक्षेंत विद्यार्थ्यांना कोणत्याहि शाळेबाहेरच्या सामाजिक किंवा सांस्कृतिक कार्यासाठीं न राबवितां हीं कार्यें शाळेंतच होऊं द्यावींत. सहा ते दहा वयोमर्यादेच्या म्हणजे इ० पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांना शिक्षकांचें साहाय्य फार लागणें हें नैसर्गिक आहे. कारण मुलें वयानें व अनुभवानें परिपक्व नसतात. त्यांचे सर्व कार्यक्रम त्या त्या शाळेपुरते किंवा शाळांच्या गटापुरतेच मर्यादित राहावेत. पण दहा ते सोळा वर्षें मुलांच्या बाबतींत म्हणजे उच्च प्राथमिक आणि माध्यमिक शाळेमार्फत हलके हलके साऱ्या गोष्टी मुलांना अनुभवूं देणें व शिक्षकानें योजना आंखून मार्गदर्शन करणें हेच खरें धोरण हवें. आज परिस्थिति मात्र अशी आहे कीं, या चळवळींचा सारा असह्य भार शिक्षकावर पडलेला आहे खेळ, वक्तृत्व, नाट्य आदि गोष्टींच्यासाठीं शिक्षकांची इभ्रत पणाला लावली जात आहे. हें सारें केलें जातें तें शाळेला मिळणाऱ्या तथाकथित कीर्तीसाठीं ! याचा परिणाम असा विचित्र होतो कीं, या साऱ्या गोष्टींसाठीं शिक्षक राबतो आणि मुलें अनुभूतीला पारखीं होतात. यामुळेंच शाळांच्या स्पर्धांचें वातावरण दूषित होतें. मग दैनंदिन अध्यापन व या व्यक्तित्व-विकासाच्या चळवळी यांचें सारखेंच नुकसान होतें. आज साऱ्या अभ्यासानुवर्ति चळवळी बदनाम झाल्या आहेत, त्याचें हें कारण आहे. ही दृष्टि केवळ शिक्षकानें ठेवून चालणार नाहीं तर चालक, प्राचार्य, मुख्याध्यापक आणि सरकार यांनींहि स्वीकारली पाहिजे. केवळ सरकारी तपासणीच्या धाकानें, नोकरीच्या स्थैर्याच्या दृष्टीनें किंवा शाळेला मोठेपणा मिळावा म्हणून जर या गोष्टी होणार असतील, तर त्यांचें भविष्य कोणालाहि सुधारतां येणार नाहीं.

असे अनुभूतीला पारखे झालेले विद्यार्थी महाविद्यालयात आले, कीं सभोंवतालच्या जीवनांत त्यांना विलक्षण पोकळी निर्माण झाल्याचा अनुभव येऊं लागतो. हेंच स्वातंत्र्य आहे, अशा समजुतीनें त्यांचें वर्तन घडूं लागतें. मग यांतून बेशिस्तीचे प्रश्न निर्माण होतात व त्यांची झळ सर्वत्र लागूं लागते. मग केवळ मार्गदर्शनानें काम करण्याची संवयच कधीं नसल्याने तीं मुले यौवनसुलभ प्रवृत्तींना बळी पडूं लागतात. त्यांना काबूंत ठेवणेंच कठीण होतें. मग व्यक्तिगत संबंध प्रस्थापित करण्याचे जे प्रयत्न होतात ते यशस्वी होत नाहींत. मग या सर्व परिस्थितीचें खापर सभोंवतालच्या सामाजिक जीवनावर फोडलें जातें.

अशा विद्यार्थ्यांच्यापैकीं सापडतील तितक्यांना आपल्या जाळ्यांत खेंचण्याचा प्रयत्न युवक-संघटना करीत असतात. अगदीं प्राथमिक शाळेपासूनच विद्यार्थी या संघटनांतून घेतले जातात. येथूनच विद्यार्थ्यांच्या मनांत एक नवा संघर्ष सुरू होतो. शिक्षक, पालक यांच्यापेक्षां या संघटनेचा शब्द ते प्रमाण मानूं लागतात त्यांच्या निष्ठा घराशीं किंवा शाळेशीं इमानी राहात नाहींत कारण एकदा युवक-संघटनेचें बाळकडू पोटांत गेलें कीं तें पूर्ण भिनतें. या संघटनांच्या सर्व कार्यक्रमांसाठीं विद्यार्थी राबतात कारण त्या क्षेत्रात ते नानाविध अनुभूति घेत असतात. त्यांना विद्यालयीन जीवन रूक्ष आणि भकास वाटूं लागतें हळूहळू तीं संघटनेचा प्रचार करूं लागतात. एक विशिष्ट विचारसरणी त्यांच्या डोक्यांत पक्की होते. त्या विचारसरणीला प्रोत्साहन देणारें वाङ्मय तीं वाचूं लागतात. आणि याचा परिपाक व्हायचा तो होतो.

वास्तविक अभ्यास आणि अभ्यासानुवर्ति चळवळी हे प्राथमिक कक्षेपासून तों महाविद्यालयीन कक्षेपर्यंत, विद्यार्थ्यांच्या शिक्षणावस्थेंतील समाजजीवनाचे घटक होत. या शिक्षणक्षेत्रान्तर्गत समाजजीवनाची पुनर्घटना करणें हें आजचें महत्त्वाचें कार्य आहे. या पुनर्घटनेंत ग्रंथालयाला अत्यंत महत्त्वाचें कार्य पार पाडायचें आहे. या पुनर्घटनेंत ग्रंथालयच अभिरुचीचें संगोपन

करणार आहे, विचारांना योग्य वळण लावणार आहे आणि मनाचें संगोपन करणार आहे. अशा या ग्रंथालयाला दुर्दैवानें आज कसलेंच स्थान उरलें नाहीं. ग्रंथालय हा एक असा घटक आहे कीं, जिथें अभ्यास आणि अभ्यासानुवर्ति चळवळ अशा दोन्ही अंगांचा उत्कृष्ट समन्वय झालेला आहे. आज या दोन्हीहि दृष्टींनीं ग्रंथालयाचा उपयोग करून घेतला जात नाहीं यामुळें, अनुभूति नाहीं आणि वैचारिक बैठकहि नाहीं अशा अवस्थेंत आमचे शिक्षक आणि विद्यार्थी सांपडले तर नवल काय ? हें समाजशिक्षण त्या व्यापक समाजशिक्षणाचा एक नैसर्गिक दुवा आहे ही जाणीव कधीं होणार ? त्यामुळेंच आज नेतृत्वाचें शिक्षण देण्याचें सामर्थ्य शिक्षकांत दिसून येत नाही. कारण शिक्षणक्षेत्रांत नेतृत्व करायचें म्हणजे विद्यार्थ्यांना अनुभूति घेण्याच्या शेंकडों वाटा दाखवावयाच्या व त्या वाटाच का या-संबंधींची आपली भूमिका सबळ वैचारिक भूमिकेवर ठामपणें दृढ करायची. हें न घडल्यामुळें शिक्षणक्षेत्राबाहेरील नेतृत्व प्रभावी ठरतें व सारें शिक्षणक्षेत्र पोरकें, अगतिक बनतें. व्यापक समाजशिक्षणाच्या मोहिमेबरोबरच आपण या शिक्षणक्षेत्रान्तर्गत समाज-शिक्षणाची मोहीम हातीं घेणें अगत्याचें आहे पण त्यासाठीं सरकार व संस्थाचालक यांनीं प्रथम आपली भूमिका या नव्या जाणिवेनें बदलली पाहिजे. शिक्षकाला सर्व बंधनात ठेवून त्याच्याकडून ही पुनर्घटना अपेक्षिणें योग्य ठरणार नाहीं. एका पैचाहि अधिक खर्च न करतां होणारी ही पुनर्घटना आहे हें अवश्य नमूद केलें पाहिजे. पण म्हणूनच ती करणें सोपें नाहीं. कारण हा, प्रश्न वैचारिक भूमिकेचा दृष्टिकोण बदलण्याचा आहे. त्यासाठीं पूर्वग्रह टाकून द्यायला हवेत मार्गदर्शनासाठीं पूर्वनियोजन करायला हवें. शिक्षणबाह्य गोष्टींसाठीं विद्यार्थी राबविला जाणार नाहीं, अशा प्रतिज्ञेनें कार्य अंगीकृत करण्याचें धोरण हवें. पक्षीय राजकारणासाठीं विद्यार्थ्यांचा उपयोग करून घेतला जाणार नाहीं अशी सार्वत्रिक प्रतिज्ञा हवी व तिचें पालन केलें गेलें पाहिजे. व्यापक अशा मानवी जीवनाच्या

अभ्युदयासाठीं आपण झटलें पाहिजे अशी ठाम निष्ठा हवी शिक्षक, मग ते कोणत्याहि कक्षेंतील असोत, ते आज आमच्या मुलांचें नेतृत्व करूं शकत नाहींत, याचें मूलत: कारण म्हणजे नेतृत्वाला लागणारी वैचारिक बैठकच तेथें अभावानें आढळते. आम्हांला खरोखर आजच्या शिक्षणांत जर कशाची वाण असेल तर ती नेतृत्वनिर्मितीच्या शिक्षणाची. माध्यमिक शिक्षणावर अहवाल सादर करणाऱ्या प्रसिद्ध **मुदलियार कमिशननें** यासंबंधीं मौलिक विचार मांडलेले आहेत. अहवालाच्या पृष्ठ २९ वर असें म्हटलें आहे कीं,

"The Primary or Basic School will inculcate in all the capacity for disciplined work while the University will train leadership at the highest level in different walks of life The special function of the Secondary School, in this context, is to train persons who will be able to assume the responsibility of leadership–in the social, political, industrial or cultural fields in their own small groups, community or locality. This does not, of course, mean that primary education will not throw up leaders–in fact, with the proper functioning of democracy, it is to be hoped that leadership will be increasingly drawn from the masses "

समाजांतून, जनतेंतून नेते निर्माण होणार असतील तर मग शिक्षणाच्या बरोबरीनें ग्रंथालयांचा म्हणजे त्यांतील ग्रंथांचा अभ्यास कसा होईल याचा गंभीरपणें विचार होणें अगत्याचें आहे.

दृक्-श्राव्य शिक्षणाच्या मर्यादा

याच ठिकाणीं आणखी हा मुद्दा स्पष्ट करणें आवश्यक आहे. नेतृत्वनिर्मितीचें शिक्षण हें केवळ माध्यमिक शिक्षणापुरतेंच मर्यादित नाहीं. प्राथमिक कक्षेंत या भावी नेतृत्वाची पायाभरणी अनेक गुणोप-

गुणांचा विकास करून करावी लागते. माध्यमिक कक्षेत या नेतृत्व-प्रवृत्तीला पैलू पाडून, ध्येयदर्शनाचा मार्ग सूचित करून तिचा मोहरा समाजाभिमुख करावा लागतो आणि विद्यापीठीय शिक्षणांत तिला प्रत्यक्ष कांहीं कर्तव्याचें प्रांगण आंखून, तपासून, परीक्षून, दुरुस्ती-पुस्ती करून भावी जीवनाच्या दृष्टीनें तयार करून ठेवायचें असतें. पण ज्यांना शिक्षणाचा कसलाहि वारसा नाहीं, संस्कारक्षम वातावरण नाहीं, आनुवंशिकतेचें देणें नाहीं, असलीच तर दैन्य व दारिद्र्य यांची काळसोबतच, अशा कोट्यवधि प्रौढांच्या समाजशिक्षणांत नेतृत्वनिर्मिति करणें किती व कसें आवश्यक आहे याचें विशेष समर्थन करण्याची गरज नाहीं. या साऱ्या नेतृत्वनिर्मितीचें प्राणभूत तत्त्व जर कोणतें असेल तर तें ग्रंथ, वाचन, विचारप्रबोधन हेंच होय नेमक्या अशा वेळींच मर्यादा जाणवूं लागतात त्या दृक्-श्राव्य ( audio-visual ) किंवा आकाशवाणी ( Broadcasting ) या शिक्षणासाठीं वापरण्यांत येणाऱ्या साधनांच्या दर्शन आणि श्रवण या दोन शक्तींचें महत्त्व मी कमी मानीत नाहीं. पण त्यांच्यांत मूलत· मर्यादा कोणती असेल तर अंतर्मुख होऊन चिंतनाला प्रवृत्त न करण्याची. प्रत्यक्ष शिक्षकानें एखादी कविता शिकविणें आणि आकाशवाणीवरून कवितेचा पाठ ऐकणें यांत फरक राहणारच. एक समूर्त आणि दुसरी अमूर्त भाक्रानानगल् धरणाचा छोटा माहितीपट पाहून आपण भारावून जाऊं, दडपून जाऊं, अंगावर अभिमानाचे रोमांच उभे राहातील, पण त्याच धरणाच्या सचित्र आणि सुंदर पुस्तिकेच्या मननानें एक वेगळा परिणाम होईल, एक वेगळा प्रत्यय येईल, एक आगळी अननुभूत ऊर्मि मनांत घर करील. ज्या संस्थांच्यापाशीं हीं साधनें आहेत त्या संस्था तरी त्याचा सातत्यानें उपयोग करतात का ? आकाशवाणीवरून विद्यार्थी आणि शिक्षक यांच्यासाठीं होणारीं भाषणें ऐकलीं जातात काय ? असें घडत

नसेल तर त्याचा शोध कोणीं केला आहे काय ? मनोमन साक्ष ठेवून सांगायचें म्हटलें तर या साधनांचा उपयोग जसा करून घ्यावा तसा घेतला जात नाहीं. ही कठोर वस्तुस्थिति आहे. शिवाय ग्रामीण भागांत तर हीं साधनें सर्वांना परवडतील असें नाहीं. आज अमेरिकेंत तर टेलेव्हिजन ही फार मोठी समस्या झालेली आहे. मुलें स्थिर बसून वाचन करीत नाहींत अशी टीका होत आहे. आपल्यासारख्या देशाला यांतून पुष्कळच शिकण्यासारखें आहे म्हणूनच पुणें, मराठवाडा यासारख्या विद्यापीठांनीं बहिःशाल ( Extra Mural ) शिक्षणाच्या योजना आखून जो उपक्रम हातीं घेतला आहे, त्याचें स्वागत आवर्जून केलें पाहिजे हीं विद्यापीठें ज्या पुस्तिका प्रकाशित करतात त्याचा भरपूर प्रसार झाला पाहिजे. हें काम सरकारचें आहे. सर्व ग्रंथालयांना हें वाङ्मय मिळालें पाहिजे, दारात येऊन पडलें पाहिजे हा प्रवाह पुन्हां ग्रंथालयाच्या उंबरठ्यापाशीं आला हें आपण जाणलें असेलच. पण,

नवी वृष्टी

पण, असे म्हणून मला थांबावें लागलें तें एका नव्यानें वादळासारख्या वेगानें कोसळणाऱ्या नव्या वृष्टीच्या स्मृतीनें ! १९४७ च्या १५ ऑगस्टपासून या वृष्टीला प्रारंभ झाला. सर्व दिशांतून ह्या धारा वर्षावत आहेत. आपण त्या पाहिल्या आहेत. मी ज्याला अनुलक्षून बोलत आहें तें म्हणजे परराष्ट्रातून फुकट वांटण्यांत येणारें वाङ्मय आणि सचित्र मासिकें, साप्ताहिकें, पुस्तिका ! इंग्रजी, मराठी, उर्दू, हिंदी, कानडी, बंगाली अशा कितीतरी भाषांतून हें साहित्य कोसळत आहे अमेरिका, इंग्लंड, रशिया, पश्चिम जर्मनी, चीन, इंडोनेशिया, जपान अशा अनेक छोट्यामोठ्या राष्ट्रांचें प्रकाशन प्रचंड संख्येनें आयात होत आहे. कांहीं परदेशीय प्रकाशकांनीं अत्यल्प किंमतींत अनुवादित पुस्तकें प्रकाशित करण्याची मोहीम हातीं घेतली आहे. आमचीं ग्रंथालयें, घरें, स्टेशन्स्, पुस्तकांचीं

दुकानें, फूटपाथ या वाङ्मयानें वाहून जात आहेत. थोडाफार ओघळ तालुक्याकडे, खेडेगांवाकडे वळला आहे. मावळांतील वेलें या गांवीं एका शेतकऱ्याच्या अकरा वर्षांच्या मुलाच्या हातांत रशियांत छापलेली, मराठींतील अस्वलाची गोष्ट, मोठ्या आकाराच्या पुस्तिकेंतील मीं पाहिली ! क्षणभर मी चकित झालों ! त्याला विचारलें कीं, तें पुस्तक कोणीं आणून दिलें ? तो म्हणाला, 'ममईच्या मामानं !' तें तीन आण्यांचें, अत्यंत आकर्षक छापलेलें, जुन्या शुद्धलेखनाचा उपयोग करून रचलेलें तें पुस्तक त्या मुलाच्या, मुंबईला गिरणींत काम करणाऱ्या मामानें दिलें होतें. भाचा शाळेंत जात होता, वाचूं लागला होता. मामानें गोडीशेव जशी न चुकतां आणली होती तसेंच तें पुस्तकहि ! ही अत्यंत सामान्य घटना मला फार अर्थपूर्ण वाटते. ' अहो, हा प्रचार आहे ' असें म्हणून या प्रयत्नांची वाट लावणें योग्य होणार नाहीं. असल्या कागदी दृष्टीनें देश जिंकण्याचे दिवस आतां उरले नाहींत हें खरें. पण माणसाचें मन बदलण्याचे हे सूक्त मार्ग आहेत. भल्या मोठ्या प्रश्नमालिकेनें माझ्या मनाला वेढा दिला ! असें स्वस्त, सुबक, आकर्षक साहित्य आमच्या प्रकाशकांना निर्माण करतां येईल का ? आमच्या सरकारला करतां येईल का ? असें साहित्य किती प्रमाणांत फुकट वांटतां येईल ? या वांटपांत ग्रंथालयांचा उपयोग किती करून घेता येईल? या साहित्याच्या प्रचारानें राष्ट्रीय, भावनात्मक ऐक्य साधतां येईल का ? या प्रकाशनांतील किती भाग व कोणता एकाच म्हणजे हिंदी भाषेंतूनच प्रसिद्ध करावा ? अशी ही मालिका न संपणारी होती. मला विचारांतीं असें आढळून आलें कीं, हें सहज करतां येईल, नव्हे, असें करणें व्यापक लोकशिक्षणाच्या दृष्टीनें फार उपकारक ठरेल. अस्पृश्यता, हलका प्रवास, स्मृतिदिनाचीं तिकिटें, वजनें, नाणीं, आराम हराम है, पत्ता अचूक कसा लिहावा, तुमचा विम्याचा हप्ता आज द्यायचा आहे काय, वन्य पशूंचें संरक्षण करा असे कांहीं उपक्रम सरकारनें केले आहेत. पण हे फार क्षीण प्रयत्न आहेत, फार तोटके प्रयत्न आहेत.

त्यांचें स्वरूप आहे तें वावटळींत गिरक्या घेणाऱ्या पाचोळ्यासारखें. त्या प्रयत्नांची वृष्टी होत नाहीं, सोसाट्याचें वादळ उठलेलें दिसत नाहीं. याच संदर्भात पश्चिम जर्मनी, नॉर्वे, फिनूलंड यासारख्या अगदीं छोट्या राष्ट्रांनीं देखील आघाडी मारलेली आहे. पूर्व आणि पश्चिम जर्मनीच्या सीमेचा वाद, चित्रें, नकाशे, आंकडे, आकृत्या, पुस्तिका, कात्रणें, भित्ती पत्रकें, वृत्तपत्रांत जाहिराती, हस्तपत्रकें यांचा अक्षरशः पाऊस पाडून ॲडनॉरच्या सरकारनें साऱ्या पश्चिम जर्मनींत तर खेळविलाच पण साऱ्या जगावर त्याचा वर्षाव केला! याचा परिणाम किती खोल, किती दूरगामी झाला असेल याची कल्पना आपण करूं शकतों. सारे आबालवृद्ध, साक्षर-निरक्षर, रोगी-निरोगी खाडकन जागृत झाले! लेखकांनीं, वृत्तपत्रें, मासिकें, टेलिव्हिजन, चित्रपट, आकाशवाणी आणि सुचेल त्या माध्यमांतून ही कल्पना साऱ्या जर्मनीभर घुमविली. साऱ्या राष्ट्राच्या रक्तवाहिन्यांतून एकच प्रवाह वहात होता--सीमेचा प्रश्न! अशी वृष्टी या भारतांत सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक आणि इतर प्रश्नांच्या बाबतींत कधीं होईल? हें काम सरकारचें आहे. हें काम खासगी प्रकाशकांचें नाहीं. त्यांचा तो प्रांत नाहीं. आपल्या देशांतील वृत्तपत्रें देखील या कार्यांत धडाडीनें सहकार्य देतील. असें आवर्षण आपल्या देशांत आहे म्हणूनच आमचें सरासरी सामान्यज्ञान फार निकृष्ट पातळीवरचें राहिलें आहे. आमच्या देशाचेंच आमचें ज्ञान, माहिती फार अपुरी, चुकीची असते. परदेशीं जाणारी आमची मंडळी स्वतःचें हसें करून घेतात याचीं उदाहरणें कमी नाहींत. युनियन पब्लिक सर्व्हिस कमिशन किंवा राज्यांतील (स्टेट) पब्लिक सर्व्हिस कमिशनसमोर येणारे उमेदवार काय घोडचुका करतात याचे पुरावे भरपूर उपलब्ध आहेत. पण या उमेदवारांच्या सामान्य ज्ञानाच्या खालावलेल्या पातळीचा दोष प्राथमिक, माध्यमिक किंवा विद्यापीठीय शिक्षणावर लादणें वास्तव आणि न्याय्य ठरणार नाहीं. शाळा-महाविद्यालयें यांचें कार्य कोणत्या तरी विशिष्ट परीक्षांच्या (आय्. ए. एस्,

कलेक्टर्स, डेप्युटी कलेक्टर्स, विविध क्षेत्रांतील शासक, इ. इ ) साठीं विद्यार्थी तयार करण्याचें नाहीं. त्यासाठीं खास वर्गांचें नियोजनच आवश्यक असतें. या परीक्षेसाठीं आवश्यक असणाऱ्या खास ज्ञानाच्या क्षेत्राभोंवतीं, सामान्य ज्ञानाचें जें विशाल क्षेत्र आहे, लोकशिक्षणाचें जें क्षेत्र आहे, तें कार्य सरकारचें आहे. सरकारनें हें ज्ञान जनतेंत खेळविलें पाहिजे. पुण्याचें महाराष्ट्रीय मंडळ या दृष्टीनें करीत असलेले प्रयत्न लक्षणीय आहेत.

हें व्यापक समाजशिक्षण केवळ निरक्षरांसाठीं नाहीं, तर तें सर्व सुशिक्षित, सुसंस्कृत, लहानथोर अशा साऱ्यांच्यासाठीं आहे. समाज-शिक्षणाची सुंदर कल्पना, निरक्षरतानाशक कार्याच्या पिंजऱ्यांत आतां कोंडून ठेवली जात नाहीं. तसें मर्यादाक्रम प्रारंभीं आहे असेल, पण साऱ्यांना आतां प्रबोधनाची नितान्त गरज आहे.

92343

क्रमिक पुस्तकें

उलट हे व्यापक समाजप्रबोधनाचें विषय, अगदीं टिप्पण यादी करून क्रमिक पुस्तकांत आणले कीं, त्या क्रमिक पुस्तकांचें स्वरूप किती दैन्यवाणें आणि केविलवाणें होतें, याचा अनुभव सर्वांना आहे. असे प्रकार मातृभाषेच्या पुस्तकांत आणले कीं, त्या पुस्तकाचें सारें अंतरंग कसें विकल होतें, छिन्नभिन्न होतें तें आपण अनुभवीतच आहोंत ना ? या क्रमिक पुस्तकाचा परिणाम बालमनावर, कुमार वयोमानातील किशोर-किशोरींवर किती विपरीत होत असेल याचा वस्तुनिष्ठ दृष्टीनें विचार झाला आहे काय ? आजच्या घडीला, हुकूमशाही राष्ट्रें सोडलीं तर कोणत्याहि लोकशाही देशांतल्या क्रमिक पुस्तकांत असें घडलेलें आढळणार नाहीं. आमचीं क्रमिक पुस्तकें सामान्य दर्जाचीं होण्याला हेंच एक खरें कारण आहे. आपल्या महाराष्ट्रापुरतें पुराव्यानिशी असें म्हणतां येईल कीं, पारतंत्र्याच्या काळांतहि भाषेच्या क्रमिक पुस्तकांचा दर्जा अत्यंत

चरचा असा राखला गेला होता आणि याचें सारें श्रेय महाराष्ट्रांतील अग्रगण्य लेखक-संपादकांना आहे. मराठी भाषेची ज्यांनीं अत्यंत मनोभावें सेवा केली, सरस वाङ्मय लिहून साहित्याची सेवा केली, आपल्या सेवेनें ज्यांनीं लोकांचीं मनें आणि हृदयें उचंबळविलीं, आपल्या मनाचें संगोपन केलें आणि त्यांना स्वातंत्र्याभिमुख ठेवण्याचें कर्तव्य केलें अशांची उपेक्षा सहजासहजीं करणें शक्य नाहीं. आजच्या शिक्षणांत उरला असेल तर तो एवढाच कोपरा मर्यादित स्वातंत्र्य भोगत आहे बाकी शिक्षणावर राज्यसरकारांचीच सत्ता आहे. अभ्यासक्रम, पुस्तकांतील विषयांचें स्वरूप, पुस्तकांना मंजुरी, पुस्तकांच्या किंमती, पृष्ठसंख्या, विषयांची निवड, कागदाचें वजन, पुस्तकाचा आकार, रंगीत चित्रांची संख्या, टाईप सारें सारें सरकाराधीन आहे. राष्ट्रीय एकात्मतेच्या घोषणेनुसार सारीं क्रमिक पुस्तकें राज्यसरकारेंच तयार करूं लागलीं कीं शिक्षणाचें संपूर्ण लष्करीकरण ( Regimentation ) झालें. मग तत्त्वतः हुकूमशाही राष्ट्रें आणि भारत या देशांमधील क्रमिक पुस्तकें एकाच पातळीवर येणार मौज अशी कीं, ही घोषणा क्रमिक पुस्तकें महाग आहेत, कारण तीं खासगी प्रकाशकांनीं प्रसिद्ध केलेलीं आहेत, यामुळें निर्माण झालेली नाहीं, तर पुस्तकाचा दर्जाच विवाद्य ठरला आहे; आणि तोहि अशा चमत्कारिक परिस्थितींत कीं, कसलाहि पुरावा, आंकडेवारी, माहिती जमा न करतांच ! लेखनप्रकाशनाचें घटनेनें मान्य केलेलें स्वातंत्र्यहि यामुळें प्रत्यक्षाप्रत्यक्षपणें मर्यादित, संकोचित होणार आहे. इतकेंच नव्हें तर हा शिक्षकाच्या, मुख्याध्यापकांच्या, स्थानिक स्वराज्यसंस्थातील शिक्षणमंडळांच्या स्वातंत्र्यावर घाला आहे. या प्रश्नासंबंधीं अतिशय मननीय विचार संडे स्टँडर्ड या नियतकालिकांत प्रसिद्ध झालेले आहेत. ते विचार असे—

There is some excuse for the inability to pay its two million school teachers very much more than what most of them get today. But there is none for its failure to give the children the best text-books that they

can have. The irony of it is that the text-books they read today are in many cases worse than ever before Even in the States where the production of text-books has been nationalised there has been little change for the better. They are as a rule poorly written, are full of errors and are shoddy in get-up. What is worse, they are often not available in time for the new school term. It is to evade the issue to imagine, as Mr. Nehru seems to do, that all that needs to be done to improve matters is to make the production of children's text-books a State undertaking Before recommending nationalisation as a guarantee for better text-books in his address to the Vice-chancellors' conference, he should have asked himself why the nationalised text-books were so poor in the States like Punjab and Rajasthan If he had done so he would have seen that the central question is not whether the production of text-books is in private hands or in government hands but whether effective action can be taken to do away with the corrupt practices in the selection of text-books After all, even in the States where the production of text-books is not nationalised it is not the private publishers but Text-book Committee consisting of officials and educationists who select the text-books No reform can help unless the Text-book Committees do their job honestly and do not allow extraneous influences to dictate their choice

Diversity rather than uniformity in teaching is what must invigorate the mental aptitude and growth of the young and help them to be useful citizens for the country. No amount of intellectual regimentations will bring about emotional integration or national unity These concepts have to develop naturally They can

only develop unnaturally in an atmosphere hidebound by governmental regulations and rules where children are reduced to robots.

एका टोकाला स्वायत्त विद्यापीठें, कीं ज्यांचा गौरव बौद्धिक स्वातंत्र्याचे प्रेषित रक्षित ( guardian angels of intellectual freedom ) असा केला जातो, त्या विद्यापीठांच्या वाटा मात्र कांटेरी कुंपणांनीं जखडून टाकलेल्या अशा अवस्थेंत नेतृत्वनिर्मिति होणार कशी ? आमच्या शिक्षणाचा सारा आशयच ( Content ) असा गोठवलेला, निस्सत्त्व राहिला, तर विचारप्रबोधन होणार कसें ? इंग्लंड-मधील शिक्षकाचा मोठ्या हौसेनें उल्लेख करून आपण सांगतों कीं, तो म्हणतो, ' हेंच विशिष्ट क्रमिक पुस्तक मी निवडीन. कारण माझ्या वर्गातील मुलांना काय हवं आहे आणि तें कसं द्यायचं हें मला ठाऊक आहे । '

भारभूत शिक्षक

पण आमच्या शिक्षकाचा सारा वेळ जातो तो हा सप्ताह, ती जयंती, हा वाढदिवस, तो बालदिन, हें प्रदर्शन, तो समारंभ, ती सागता, ही परिषद, ती सभा, ही निवडणूक, तो वननिवास, हा उत्सव, तो दिन, अशा वास्तविक सरकारनें व समाजानें आयोजित करण्याच्या कार्यक्रमात ! तो या समाजशिक्षणाशीं एकरूप होत नाहीं आणि शाळेशींहि तद्रूप राहूं शकत नाहीं.

वाढत्या संख्येच्या वर्गांना शिकवा, अभ्यासानुवर्ति चळवळींत मार्गदर्शन करा, आपलें ज्ञानहि वाढवा, शिक्षणाचा दर्जाहि वाढवा, मुलांच्या सर्वांगीण विकासासाठीं झटा, सक्तीच्या शिक्षणाची मोहीमहि गतिमान् करा आणि मघाशीं उल्लेखिलेल्या साऱ्या व्यापक शिक्षणाच्या गोष्टीहि करा. हें कसें साधणार ? तशांतच आपण स्वीकृत केलेल्या

मूलोद्योगी शिक्षणपद्धतीमुळें तर प्राथमिक शिक्षकांवर कामाचा ताण अपरंपार वाढलेला आहे. पाळी-पद्धति ( shift system ), एकशिक्षकी शाळा, प्रत्यक्ष शाळा असलेलें आडवळणी गांव अशा आणखी कितीतरी गोष्टी आहेत कीं, त्यामुळें प्राथमिक शिक्षक अक्षरशः मोडून गेलेला आहे. पण जिद्द मोठी कीं, तो हें सारें करण्याची धडपड करीत आहे. त्याला आतां हवा आहे तो आपल्या मुलांना शिकविण्यासाठीं वेळ आणि स्वतःच्या वाचनासाठीं थोडी सवड ! शिक्षक आणि विद्यार्थी यांचे घनिष्ठ संबंध आज येत नाहींत त्याचें हें मूळ कारण; शिक्षकांना तशी सवडच नाहीं. The school as a community centre असें जेव्हां म्हटलें जातें किंवा The school as a miniature society असें फ्रोबेलनें केलेलें स्पष्टीकरण आपण स्वीकारतों, त्याचा अर्थ आज फार चमत्कारिक लावला जात आहे. या अर्थन्यासामुळेंच ना अत्र ना परत्र अशी शिक्षकाची अवस्था झालेली आहे. सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा प्रसार करण्याचें काम करण्यास शिक्षकांना खरोखर वेळच उरत नाहीं. आपल्या शाळेच्या कार्यक्षेत्रांतच शिक्षकांना अनुभवनिर्मिति करूं देणें अगदीं शक्य आहे. जेथें आणि जेव्हां व्यापक समाज-जीवनाशीं एखाद्या गोष्टीचा नैसर्गिक समवाय होऊं शकेल तेवढाच तो घडूं देणें अगत्याचें आहे. शाळेची वास्तू आणि साहित्य याचा उपयोग समाजाला अगत्यानें व्हावा पण त्याचें ओझें शिक्षकावर नको. लहानशा गांवापासून तों मोठ्या शहरापर्यंत आज डॉक्टर, वकील, व्यापारी, इंजिनिअर, कारकून, धंदेवाले आदि लोक अशा व्यापक समाजशिक्षणाशीं गरजेप्रमाणें कसे निगडित होऊन सहकार्य देतील, हा खरा प्रश्न आहे. आम्ही वर्गणी देतों, सभेला जमलें तर येऊं, फार तर अध्यक्ष होऊं, बाकी तुमचें तुम्ही बघा, असें सांगून मोकळा राहाणारा हा समाजाचा भाग शिक्षकाला अक्षरशः आज राबवून घेत आहे. 'मास्तर' या संबोधनाऐवजीं 'गुरुजी' असा फरक झाला तरी शिक्षकाचे सामाजिक स्थान उंचावलेलें नाहीं.

केवळ समारंभाच्या निमंत्रणानें तें स्थान मुळींच उचावणार नाहीं. बैठका, सतरंज्या, दिवाबत्तीपासून तों श्रोते गोळा करून आणण्यापर्यंत शिक्षक झटतात आणि याचाच विलक्षण परिणाम त्याच्या अंतर्बाह्य जीवनावर होतो. खोट्या प्रतिष्ठेचें वलय त्याच्याभोवतीं गुंडाळलें जातें. तो गुदमरतो, कासावीस होतो आणि सारखा काम करीत असतो. हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे कीं, तो याहि ओढगस्तींत आपलें दैन्य झाकीत असतो. हसतमुख राहतो. फार राग आला तर घरच्या पोरांना दोन रट्टे ओढतो, घर धनिणीवर संतापतो, शाळेंतल्या पोरांवर कातावतो, पण अंगावर हात नाहीं टाकीत ! टाकीत असलाच तर लगेच चिचकून सावरून घेतो. कारण तशी शिक्षा करण्याची मनाई आहे, समाजातल्या प्रतिष्ठितांचा धाक आहे ! या ओझ्याखालीं तो वाकला आहे; आणि सगळ्यांत कंबरडें मोडून टाकणारी काडी म्हणजे तो ध्येयवाद--' भावी पिढीचे शिल्पकार ! '

## व्यासंगाला आवाहन

हा ध्येयवाद जर सफल व्हायचा असेल तर शिक्षकाच्या व्यासंगशीलतेला आवाहन आणि आव्हान केलें गेलें पाहिजे. हें आवाहन उत्कृष्ट साहित्यच करूं शकेल. दर्जेदार वाङ्मयच त्याच्या विचारांना आव्हान देईल. असें साहित्य मराठींत कमी नाहीं. पण त्या साहित्याचें प्रकाशन मात्र फार खर्चाचें झालेलें आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर कागद, शाई, बाबणी, छपाई, टाईप आदि सर्वांचे भाव कडाडले आहेत. पुस्तकाच्या किंमती भराभर वाढत आहेत. असें साहित्य विकत घेऊन वाचणारे देखील सार्वजनिक ग्रंथालयात वर्गणी भरून मागवितात, तिथें शिक्षक स्वतःचें ग्रंथालय कसें निर्माण करणार ?

साहित्य-संस्था, प्रकाशक व सरकार

इथे सरकारनें धडाडीनें पुढें येऊन खासगी प्रकाशकांना असें आश्वासन द्यायला हवें कीं, कोणत्याहि क्षेत्रांतलें उत्तम वाङ्मय प्रकाशित करा; सरकार त्याच्या हजारों–नव्हे लक्षावधि–प्रती घेईल व प्राथमिक व माध्यमिक शाळांना वाटून देईल. आज प्राथमिक आणि माध्यमिक शाळांनाच नव्हे तर महाविद्यालयांना देखील काटकसरीची सुरवात, शिक्षकां-नंतर करावी लागते ती ग्रंथालयापासून ! ग्रंथालयाचीं वार्षिक अंदाजपत्रकें आक्रसूं लागलीं आहेत. खासगी प्रकाशकांना धंदे टिकविणें अवघड जाऊं लागलें आहे याचा अर्थ प्रकाशकाचें कार्यक्षेत्र मर्यादित करावें असा नाहीं. उलट त्यांच्या परंपरांना, प्रयत्नांना वळण देणें, त्यांना भरघोस आर्थिक साहाय्य पुस्तकें विकत घेऊन करणें दुर्मिळ ग्रंथांचें पुनरुज्जीवन करणें हें खऱ्या लोकशाही, पुरोगामी सरकारचें कार्य आहे साहित्य-निर्मिति लेखकांना उत्तेजन-बक्षिसें देऊन करणें, अनुवाद करून घेणें हीं कामें सरकारनें अंगावर न घेतलेलीं बरीं. कारण तीं सरकारी यंत्रणेच्या अपरिहार्य दोषापासून अलिप्त राहूं शकत नाहींत. ग्रंथ-निवड समितीच्या सभासदाचीहि कुचंबणा होते. मग अमक्यालाच बक्षीस कां, कोणत्या कसोट्या वापरल्यात, सभासदांचीं नांवें जाहीर करा, अशा टीकेला जागा निर्माण होते. मग यंदा अमक्याला मान दिला. आतां तो तमका फार वृद्ध झाला आहे, देऊन टाका त्याला बक्षीस, असे विचार बलवान् होतात आणि पुन्हां सरकारलाच सारी टीका गिळावी लागते. यामुळें नुसतें साहित्याचेच नव्हे, तर साऱ्या कलांचें क्षेत्र गढूळ झालेलें आहे; आणि सरकार म्हणजे तरी कोण ? आपलींच माणसें तिथें असतात ना ? तेच सरकार, आपले प्रतिनिधीच. उत्कृष्ट पुस्तकें शाळा-महाविद्यालयांच्या दारात पडलीं पाहिजेत. तीं वाचलीं गेलीं पाहिजेत. त्यांच्या वारंवार आवृत्त्या निघाल्या पाहिजेत. एका प्रबल राजकीय पक्षानें असें ठरविल्याचें नुकतेंच जाहीर झालें आहे कीं, निवडणुकींतील स्पर्धक उमेदवारांना बारा

हजार ते वीस हजार माहितीपत्रकें वांटण्यासाठीं वापर्चीं आहेत. निवडणूक हा जनशिक्षणाचा मार्ग आहे हें सर्वमान्य आहे. आपल्या पक्षाची माहिती पत्रकांच्याद्वारें जनतेंत पोंचवावी हेंहि युक्त आहे. पण असे उपक्रम फक्त निवडणुकीपुरतेच कां ? सत्तारूढ पक्षानें हें व्यापक जनशिक्षण अहर्निश चालू राखलें पाहिजे. अशी वृष्टी सुंदर पुस्तकांची व्हावी, पत्रकांची व्हावी, चित्रांची व्हावी, शिक्षकाच्या घरीं, दारीं, शाळेंत असें विचारप्रबोधनाचें वातचक्र फिरलें पाहिजे. हें काम खासगी प्रकाशकांच्या सहकार्यानें केलें तर त्याला एक प्रकारचा जिवंतपणा लाभेल. याच संदर्भात आपल्या महाराष्ट्रांत आघाडी मारली आहे, ती **मराठवाडा विद्यापीठानें.** प्रत्येक प्राध्यापकाला ग्रंथ विकत घेण्यासाठीं अनुदानें देण्याची प्रथा रूढ केली जात आहे. आज मराठवाड्यात नव्या उमेदीनें या संधीचा लाभ प्राध्यापक घेत आहेत. पुणें विद्यापीठानेंहि ग्रंथप्रकाशनाला अनुदानें देण्याची प्रथा रूढ केलेली आहे. पण हे प्रयत्न मर्यादित राहणार. राज्य सरकारचे बळकट हात ज्या प्रमाणावर हें कार्य करूं शकतील, तसें विद्यापीठांना जमणार नाहीं. आपण मला आठवण करून देऊन म्हणाल, ' अहो, मध्यवर्ति आणि राज्य सरकारें ग्रंथोत्तेजन करीत नाहीं का?' होय, ते सारे यत्न मी नजरेआड केलेले नाहींत. सरकार नाट्यस्पर्धा आयोजित करतें, लोकनाट्य-स्पर्धा घडवितें, कथा-कादंबऱ्याना बक्षिसें देतें, उत्तम छपाईचा गौरव करतें, कला-प्रदर्शनें भरवितें आणि पुष्कळ, पुष्कळ करतें ! पण गौरवानें दिलेल्या मानचिन्हानीं प्रश्न सुटत नाहीं. एखाद्या सरकारी बक्षिसासाठीं पुस्तकांच्या प्रती धाडायच्या, त्या सुद्धा विकत घेतल्या जात नाहींत सरकारकडून. बरें, पुस्तकें घाडलीं तर लेखकाना हजार, पांचशें, दोन हजार मिळतात. पण प्रकाशकानें त्यासाठीं घातलेलें भांडवल पूर्णांशानें भरून निघत नाहीं. यांतूनच मग लेखक-प्रकाशकांचे अलिखित करार घडून येण्याचा धोका निर्माण होतो. महाराष्ट्र राज्यानें मराठी भाषेच्या विकासासाठीं **साहित्य व सांस्कृतिक** मंडळ निर्माण केलेलें आहे; पण त्याच्याहि दानशक्तीला मर्यादा आहेत.

तेथील प्रकाशन-स्वरूपाला मर्यादा आहेत. पुनः तिथेंहि सरकारी सांचा आहेच. वास्तविक हीं सारीं कामें समर्थपणें करूं शकणाऱ्या साहित्य-संस्था नव्या महाराष्ट्रांत आहेत. **महाराष्ट्र साहित्य परिषद, मुंबई मराठी साहित्य संघ, विदर्भ साहित्य संघ, मराठवाडा साहित्य परिषद** आणि या सर्वांनीं निर्माण केलेलें **महामंडळ** यांचें हें खरें कार्य आहे. एकीकडे आपण सत्तेचें **विकेंद्रीकरण** करीत आहोंत, तर दुसरीकडे साहित्य, संगीत, नाट्य, आदि कलाचें **केंद्रीयीकरण, केंद्राश्रयीकरण** कशासाठीं करीत आहोंत? अनुभवाचें उदाहरण देऊन सांगतों कीं, 'संशोधनपर, विचारप्रवर्तक लेखनाला वाहिलेलें महाराष्ट्र साहित्य परिषदेचें मुखपत्र, **साहित्य पत्रिका**, तो तोटा सोसून चालविली जात आहे. अगतिकतेनें तिला सरकारी जाहिरातीकडे आशेनें पहावें लागत आहे! साहित्य-प्रकाशनाची ही एका श्रेष्ठ आणि ज्येष्ठ साहित्य-संस्थेची शोकांतिका आहे! **छंद** सारखें पदराला खार लावून चालविलेलें एक सुंदर नियतकालिक असेंच आर्थिक घातचक्रांत विराम पावलें. **मौजसारख्या** दर्जेदार साप्ताहिकाला पूर्णविराम घ्यावा लागला. **साधनेसारख्या** साप्ताहिकाला संग्राम करून जगावें लागतें हें आपण पहातोंच ना! ही जर ललित साहित्याची अवस्था, तर केवळ शिक्षणालाच वाहून घेतलेल्या नियतकालिकांची काय गत असेल? हो, तो खरोखर चिंतनीय विषय आहे.

शिक्षणविषयक साहित्य

महाराष्ट्रापुरतें आणि मराठी भाषेपुरतें बोलायचें तर शिक्षण विषयावर लिहिलेले ग्रंथ संख्येनें ३५० ते ४०० इतकेच आहेत. त्यांत अनुवादित ग्रंथांनाहि समावेश आहे. हे ग्रंथ-लेखन करणारे लेखक मात्र फार कमी आहेत. त्यांच्या ग्रंथांचें स्वरूप सामान्यत प्रसंशनीय याच सदरांत दाखल करून घ्यावें लागेल. पण या लेखकांपैकीं फारच थोडे, हातावर

मोजता येण्यासारखे आहेत कीं, ज्यांच्या लेखणीला लालित्याचा, सौंदर्याचा स्पर्श झालेला आहे. याचा एक परिणाम असा दिसून येतो कीं, सर्व-सामान्य वाचक आणि शिक्षणाशीं निगडित असलेले लोकहि या ग्रंथांचें वाचन आपणहून, आवर्जून करण्यास राजी नसतात. प्रशिक्षणासाठीं येणारे शिक्षक केवळ परीक्षेसाठीं वाचतात आणि पुस्तकें बाजूला सारतात. ही परिस्थिति म्हणजे या लेखकांना दिलेलें मी एक आव्हान मानतों. शिक्षणातील विषयांची सूचि असें सांगते कीं, ३० ते ३५ असे विषयांचे प्रकार पडतात. केवळ शिक्षणविषयक नियतकालिकें फक्त १०।१२ च मराठींत प्रसिद्ध होतात. ४०० शिक्षणावरचे ग्रंथ आणि १० नियत-कालिकें म्हणजे हा संसार आपल्या ग्रंथालयांतील फक्त दोन कपाटांत मावूं शकेल. मानवी संसारांत छोटेपणा, आटोपशीरपणा हा गुण ठरेल. पण ग्रंथालयाच्या संसारांत हें कुटुंबनियोजन नुसता दोषच नव्हे तर काळिमा ठरेल. आपल्याला हें ठाऊक आहेच कीं लेखक गंमतीनें आपल्या ग्रंथांना अपत्यें म्हणतात. ग्रंथकाराचा संसार हा दुहेरी असतो त्याच्या प्रतिभेची कूस जितकी जोमदार तितका त्याचा साहित्य-संसार डवरलेला, फुललेला, लहडलेला ! पण त्याचा व्यावहारिक संसार जितका आटोपशीर तितकाच तो सह्य आणि सुखकारक, त्याला स्वत:ला आणि समाजाला देखील ! पण आमचा दोन कपाटांतला संसार समाजाची कोणती तहान भागविणार ? बरें, या संसाराची सारीपाट-क्रीडा कांहीं पांचदहा वर्षांतली नाहीं. १८०० पासून १९६० सालापर्यंत चाललेला हा डाव आहे. या डावाला गति नाहीं, जोम नाहीं, आवेश नाहीं. हा डाव कुठेंतरी कुंतत पडलेला नाहीं ना ? बुद्धिबळें खेळणारे दोन कुशाग्र वीर जसे तासन् तास डोकीं खालीं घालून, टक लावून प्याद्यांच्या सूक्ष्मतम हालचालींचा विचार करीत बसतात तसा भास होतो. याचीं कारणें काय ? शिक्षणावरच, मग तें कोणत्याहि शाखेंतलें असो, २००० च्या आवृत्तींतील पहिलीं ५०० फारतर सहाशें पुस्तकें बऱ्या वेगानें खपतात, पण पुढील प्रत्येक प्रतीला

संग्राम करूनच गुदामांतून बाहेर पडावें लागतें. वाढलेल्या किंमती हें कारण आहेच, पण त्याहून किंबहुना समबल कारण म्हणजे, त्याचा प्रसार सर्व माध्यमिक, प्राथमिक शाळा आणि महाविद्यालयें यांत होत नाहीं. शासनाधिकारी ( Administrative Officers ) आणि जिल्हा किंवा नगरपालिकेच्या शिक्षणमंडळाचे अध्यक्ष जेव्हां पुस्तकांची खरेदी करतात तेव्हां या शिक्षणावरच्या पुस्तकांची खरेदी कां होत नाहीं? त्यांना हें शक्य होत नसेल तर शिक्षणखात्यानें हीं पुस्तकें प्रत्येक शाळेला पुरविलीं पाहिजेत असें म्हणणें अस्थानीं ठरेल काय? हा खर्च कधींहि वाया जाणार नाहीं! टेबलें, खुर्च्या, बाकें, बादल्या, फडकीं ( Dusters ), चटया, केरसुण्या यांचीं हजारों रुपयांचीं ढेरें फुटत असतात. मग पुस्तकांना असें उपेक्षित कां राहावें लागतें? या ठिकाणीं मला पं. जवाहरलालजींनीं पुण्याच्या भेटींत, सेवासदनात काढलेले उद्गार स्मरतात. पंडितजी म्हणाले, "मोठयाला इमारती, साहित्य, फर्निचर याच्यामागें शाळांनीं धावूं नये. आपल्या गरीब देशाला हें परवडणार नाहीं" एकीकडे हा प्रसाराचा वेग वाढलाच पाहिजे आणि दुसरीकडे शिक्षणावर लेखन करणाऱ्यांनीं आपली शैली सौंदर्यपूर्ण, प्रत्ययकारी करण्यासाठीं झटलें पाहिजे. या ठिकाणीं कितीतरी सुंदर इंग्रजी पुस्तकांचा निर्देश करण्याचा मोह मला होत आहे. पण नांवें किती सांगू? आपल्या राज्याचे भूतपूर्व विद्याधिकारी श्री. भांडारकर यांच्या अमदानींत, त्यांच्या पत्नी सौ. शांताबाई भांडारकर यांनीं व समाजशिक्षणाधिकारी श्री कर्णिक यांनीं भोरला रामबागेत एक बालवाङ्मयाचें शिबिर आयोजित केलें होतें. त्या वेळीं, रामबागेतल्या भोरकरांच्या बंगल्यांतील दोन प्रचंड खोल्या इंग्रजींतील सुंदर पुस्तकांनीं त्यांनीं गच्च भरल्या होत्या. तीं सुंदर पुस्तकें अजून डोळ्यांसमोर नाचून खुणावींत आहेत! त्या दोन खोल्यांना स्वरूप आलें होतें तें यक्षभूमींतल्या वनस्थलीचें. युरोपांतील सर्व पेठांतील नाना-रंगी वस्त्रप्रावरणें आणि आभूषणें लेवून आलेल्या या ग्रंथांनीं मला

खरोखर मोहून टाकलें होतें. ग्रंथांचा सुगंध म्हणतात तो कसा असावा याचा प्रत्यय त्या वेळीं आला, तो अजून जागा आहे. हें आवर्जून स्पष्ट करतों कीं, हीं पुस्तकें म्हणजे बालवाङ्मय नव्हतें, तर बालवाङ्मयासंबंधींचीं होतीं आणि जें बालवाङ्मय होतें तो तर दिव्यत्वाचा ठेवा होता.

आपल्या शिक्षणविषयक दहाबारा नियतकालिकांचें जीवन तर याहून खडतर आहे. या नियतकालिकांचें स्वरूप अंतर्बाह्य उजळून टाकलें पाहिजे. आधींच फार उशीर झाला आहे. खुद्द सरकारी नियतकालिक-देखील पोरकेंच राहिलें आहे. गुरुवर्य बाबूरावजी जगतापांचा ' शिक्षक ' चाळीस वर्षे उभा आहे, एकाकी, ' अकला चलो ' ही रवींद्रनाथांची ओळ गुणगुणत ! नगरचा ' अध्यापक ' असाच धडपडत आहे यांना हात कोण देणार ? मनांत आणलें तर सरकारच हें रूपसंवर्धन करूं शकेल. शेंकडा नव्वदांहून अधिक टक्के खर्च प्राथमिक शिक्षणावर करणाऱ्या सरकारला हें रास्त मागणें सहज पूर्ण करता येईल. हा प्रश्न पूर्ण सहकार्याचा आहे. ही कोणत्याहि एका पक्षाची मागणी नाहीं. ही व्यापक समाजशिक्षणाची, शिक्षकांच्या ज्ञान-साधनेची, शिक्षणाच्या मूलमंत्राच्या चिंतनाची मूलभूत गरज आहे. शिक्षणाचे सारे मार्ग मोकळे करणाऱ्या, आर्थिक अडसर दूर करणाऱ्या सरकारला हें करणें सदासर्वदा भूषणभूतच ठरेल.

नव्या प्रेरणा

१५ ऑगस्ट १९४७ सालीं आपण स्वतंत्र झालों. शिक्षणाच्या सार्वत्रिक प्रसाराची देशव्यापी मोहीम आपण हातीं घेतली आहे. यामुळें आज महाराष्ट्राच्या गांवगाड्यातून एक नवचैतन्य खेळूं लागलें आहे. हीच एक मोठी शुभंकर गोष्ट आहे. उलट शहरी भागात मात्र एका विफलतेच्या भावनेनें शिक्षित समाजाला घेरलेलें आहे. ही विफलता कशाचा परिपाक आहे याचा विचारदेखील करण्याची उसंत या

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे, स्थळप्रत.
अनुक्रम (३२) 22629 वि: ...
क्रमांक ... नों. दि. ...

समाजाला मिळविण्याची गरज वाटत नसावी असें भासत आहे. अशा अश्रद्धावादाचा परिणाम सर्व क्षेत्रांत दिसून येतो. याच्या अगदीं उलट, जानपद-जीवनांत कर्तृत्वाला बहर आलेला दिसतो. सहकारी उद्योग, वीज, शाळा, नभोवाणी, चित्रपट, वाहतूक, रस्ते, पाणी आदि घटकांच्या सुव्यवस्थेचा, नियोजनाचा परिणाम ग्रामीण जनतेच्या अंगोपांगीं प्रतीत होऊं लागला आहे. याच ठिकाणीं आतां ग्रंथालयाला आपलें अग्रमानाचें स्थान भूषित करायचें आहे. साक्षरतेला चिरस्थायित्व देणें, नव्या नेत्यांना नवी दृष्टि देणें, मुलांना नव्या वाङ्मयीन व शास्त्रीय सृष्टीची ओळख करून देणें, स्त्रियांना आपलें गृहजीवन अधिक संपन्न करण्याचा मार्ग दाखविणें अशीं कितीतरी कामें ग्रंथालयाला करायचीं आहेत या नव-जीवनाला, उत्साहाला गतिमान् करून नवीं ध्येयें, नव्या आकांक्षा यांकडे नेणारा मार्ग ग्रंथालयानेंच प्रकाशित करायचा आहे. मराठी मनाच्या नव्या जाणिवांचें-नेणिवांचें संगोपन ग्रंथालयाला करायचें आहे. या दृष्टीनें ग्रंथपालाला फार जागरूकपणें कार्य करावें लागेल. एका अर्थानें ग्रंथालय हें अभिरुचीचें दीपगृह असतें, विचारांचें वाहक असतें.

अलीकडच्या पांचसहा वर्षांत महाराष्ट्राच्या ग्रामीण विभागांत माध्यमिक शाळा, महाविद्यालयें स्थापन करण्याच्या प्रवृत्तीला विलक्षण वेग आलेला दिसतो. या संस्था काढण्याची चढाओढच लागली आहे कीं काय असा भास व्हावा, इतपत हा वेग वाढलेला आहे. एका रात्रीं-तून अक्षरशः हजारों रुपये जमा करण्यांत येत आहेत. संस्थेसाठीं मोठाल्या जमिनी मिळविण्यांत येत आहेत, अस्तित्वांत असलेल्या इमारती प्रथम निवडून, लगोलग नव्या प्रचंड इमारती बांधण्याच्या योजना अमलांत आणल्या जात आहेत. फर्निचर, शास्त्रीय उपकरणें, खेळाचें साहित्य, पुस्तकें इत्यादींसाठीं प्रचंड पैसा उभारला जात आहे या नव्या संस्थांचें स्वागत करतांना काळजी वाटणारे प्रश्न मनाला स्पर्श करून जातात. हा

शिक्षणप्रसार कोणत्या नियोजनानुसार होतो आहे ? या नियोजनाची निश्चित रूपरेखा सरकारनें आंखली आहे काय ? या संस्थाचा एकदोन वर्षांनंतरचा चरितार्थ कसा चालेल ? या संस्थांचें वेगळेंपण ( individuality ) कशांत आहे ? का शहरांतील संस्थांच्याच या केवळ प्रतिमा ठरणार ? या संस्था आणि सभोंवतालचें लोकजीवन यांचा समन्वय कसा राखायचा ?

हें सारें मनांत येतें. कारण या संस्थांत येणारे विद्यार्थी, त्यांचा बौद्धिक मगदूर, त्यांची आर्थिक परिस्थिति, त्यांच्या आकांक्षा, त्यांच्या अभ्यासानुवर्ति चळवळी ( Co-curricular activities ) आणि त्यांना कोणत्या पद्धतीनें कोणत्या प्रकारचें नेतृत्वाचें शिक्षण देणें अगत्याचें आहे याचा रेखीव व स्पष्ट असा विचार कोठेंच झालेला आढळत नाहीं. या सगळ्या घडामोडींत गावांतील प्राथमिक शाळा, तेथील ग्रंथालय किंवा गावातील ग्रामग्रंथालय अगर वाचनालय याकडे योग्य लक्ष पुरविलें जातें काय असें मनांत येऊन जातें मूलभूत शिक्षणाचा प्रसार ( Fundamental Education ) आणि माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षणाचा प्रसार यांमधील प्रमाणाचा स्पष्ट विचार झाला आहे काय ? भारतासारख्या फार मोठ्या प्रमाणात निरक्षर असलेल्या देशांत तर या प्रमाणाचा विचार प्रथम होणें अगत्याचें आहे. विद्यापीठांची, महाविद्यालयांची संख्यात्मक वाढ हा निरक्षरतेचा प्रश्न कसा सोडविणार ? त्यासाठीं व्यापक समाजशिक्षणाची मोहीम अधिक प्रखर करणें जरूर आहे. नेमक्या याच ठिकाणीं, **युनिव्हर्सिटी एज्युकेशन कमिशननें**, १९४९ सालीं प्रसिद्ध केलेल्या आपल्या अहवालांत ज्याचा आवर्जून उल्लेख केलेला आहे, त्या **लोक-महाविद्यालयाची** ( People's College ) आठवण येते. ‘ राष्ट्रांतील जनतेला शिक्षित करण्यात यशस्वी झालेला एकमेव प्रयोग ’ असा सार्थ गौरव या लोक-महाविद्यालयांचा केलेला आहे. डेन्मार्कमधील लोकजीवनात आमूलाग्र क्रांति करून या प्रयोगानें नवचैतन्य निर्माण केलें. या

व यासारख्या प्रयोगांची माहिती सर्वत्र प्रस्तुत करणें, नव्यानें संस्था स्थापणाऱ्यांना अशा प्रकारच्या संस्था निर्माण करण्याची प्रेरणा देणें किंवा स्वतः अशा स्वरूपाचा एखादा प्रयोग करणें हें राज्यसरकारचें कर्तव्य आहे. सहकारी चळवळ, सामुदायिक शेती यासारख्या सर्वत्र नव्यानें ज्यांचें मूळ रुजत आहे अशा कार्यक्रमाच्या बरोबरीनें जर शिक्षण-विषयक प्रयोग नियोजित केले गेले तर जानपद जीवनांतील नव्या जाणिवांना, उमेदींना, आकांक्षांना एक वळण लागेल व अंतीं कल्याण-कारी राज्यनिर्मितीच्या घडणीला प्रारंभ होईल. ग्रामीण शिक्षणाचें खरें कार्य सांगत असतांना युनिव्हर्सिटी एज्युकेशन कमिशननें आपल्या अहवालांतील पृष्ठ ५७२ वर एक वेधक परिच्छेद लिहिला आहे. तो उतारा असा,

"The great material wealth of mankind is not its stored wealth, its hoarded gold, its cities, railroads, ships and factories, but the current year by year production of wealth by the people. The pontential wealth-producing capacity of men is almost incredibly great. What are lacking are not natural resources or human energy but a clear mental picture of what is desirable, and possible, and the character, skill, experience and culture necessary to realise such possibilities. These qualities it is the main business of rural education to provide."

असें डोळस नेतृत्व कधीं लाभेल याचीच चिंता आज सुजाण, विचारी भारतीयांस लागलेली आहे.

शिक्षक संघटनांची भूमिका

प्राथमिक, माध्यमिक आणि महाविद्यालयांतील, विद्यापीठांतील शिक्षकांच्या संघटनांना आपापल्या शिक्षणक्षेत्रांत विधायक प्रकारचें कार्य

करून भारतीय शिक्षणाला वळण देतां येईल काय, असा विचार अपरिहार्य-पणें या ठिकाणीं मनांत येतो. प्राथमिक शिक्षकांची फार मोठी संघटना अस्तित्वांत आहे. माध्यमिक शिक्षकांची व माध्यमिक शाळांतील मुख्या-ध्यापकांची देखील संघटना आहे. अशा घटनानिष्ठ संघटना महाविद्या-लयें व विद्यापीठें या क्षेत्रांत विकसित झालेल्या नाहींत. पुणें विद्यापीठांतील शिक्षकांची अशी एक संघटना ( P. U T. A. ) अगदीं अलीकडे कार्य करूं लागली आहे. या संघटनांच्याकडे पहाण्याचा दृष्टिकोण सरकारनें जसा राखावा तसा राखलेला दिसत नाहीं. या शिक्षकांच्या संघटनेसंबंधीं संस्था-चालकांनीं देखील आपली भूमिका स्पष्ट राखलेली आढळत नाहीं. यामुळें प्रतिवर्षीं होणाऱ्या प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांच्या परिषदां-पासून फलदायी असें कार्य घडून आलेलें दिसत नाहीं. विद्यापीठीय क्षेत्रातील प्राध्यापक शास्त्र, तत्त्वज्ञान, संस्कृत, इतिहास अशा विविध परिषदांना जातांना आढळतात, पण विद्यापीठीय शिक्षकांची अशी खास परिषद् भरत नाहीं. या परिषदांमधून जर खरोखर भरीव कार्य व्हावयाचें असेल तर कोणत्याहि एखाद्या शाळेंतील अगर महाविद्यालयांतील शिक्षक, त्या शिक्षकांची संघटना व त्या सर्वांचें वार्षिक अधिवेशन अशा क्रमानें एकेका प्रश्नाचा प्रायोगिक अभ्यास करवून घेऊन त्याची चर्चा सर्व देशा-समोर आली पाहिजे, निष्कर्षांचा ऊहापोह झाला पाहिजे. आपण या ठिकाणीं फक्त प्राथमिक शिक्षणक्षेत्राचा विचार करीत असल्यानें हें विवेचन तेवढ्यापुरतेंच करावें लागणार आहे. माध्यमिक आणि विद्या-पीठीय क्षेत्रांसंबंधीं जशीं **सेकंडरी एज्युकेशन कमिशन** व **युनिव्हर्सिटी एज्युकेशन कमिशन** अशीं अखिल भारतीय कमिशनें नेमलीं गेलीं व त्यांच्या मार्फत सर्व प्रश्न तपासले गेले, तद्वतच प्राथमिक शिक्षणाची चौकशी होणें अगत्याचें आहे. या कार्याचा व्याप फार मोठा आहे. म्हणून प्रथम राज्य सरकारांनीं प्रथम राज्यापुरतीं कमिशनें नेमून ही चौकशी करून पूर्वतयारी करावी. तत्पूर्वीहि प्रत्येक जिल्ह्यांतील प्राथमिक

शाळांची चौकशी होऊन त्यांत मूलभूत प्रश्नांचीच केवळ चर्चा व्हावी व प्रायोगिक पुराव्यानें ही चर्चा साधार करून मगच निष्कर्ष माडावेत. मग खऱ्या अर्थानें प्राथमिक शिक्षकाला आपलें मन मोकळें करून आपले अनुभव व विचार सांगतां येतील. त्यासाठींच अभ्यासक्रम, क्रमिक पुस्तकें, समाज-शिक्षण, अध्यापन-पद्धति इत्यादि दैनंदिन प्रश्नांचा आंकडेवार अभ्यास करून नवे उपक्रम हातीं घेऊन त्यांची समूर्त फलश्रुति प्राथमिक शिक्षकांच्या संघटनेनें सरकारला सादर केली पाहिजे. अर्थातच अशा केवळ शैक्षणिक उद्दिष्टांनीं प्रेरित झालेल्या प्रयोगांना सरकारनें मोकळ्या मनानें वाव दिला पाहिजे व योग्य निष्कर्ष स्वीकारून ते अमलांत आणण्याची पुरोगामी वृत्ति प्रकट केली पाहिजे.

पण केवळ, कसलीहि वर उल्लेखिलेली पूर्वतयारी न करतां जर प्राथमिक शिक्षणाच्या चौकशी आणि अखिल भारतीय पातळीवरून कमिशन नेमलें गेलें तर त्याचा उपयोग होणें कठीण आहे. पण त्या-बरोबरच शिक्षकांनीहि आपली भूमिका ओळखून ती उत्तम पार पाडण्याची पराकाष्ठा केली पाहिजे. आपली अध्यापनपद्धति, पुस्तकें, अभ्यासक्रम, अभ्यासानुवर्ति चळवळी इत्यादि गोष्टींसंबंधीं प्रयोग करण्यास, अनुभव टिपून ठेवण्यास त्यांनीं सदैव तयारी ठेवली पाहिजे. या शिक्षकांना मार्गदर्शन कोण करणार ? प्राथमिक शिक्षकांवर आज जे नगरपालिका, लोकलबोर्ड व स्कूल बोर्ड यांचा जो अधिकार चालतो यामुळें होणाऱ्या परिणामांचें वर्णन करतांना प्राचार्य मो. वा. दोंदे पुण्याच्या डेक्कन एज्युकेशन सोसायटीनें प्रकाशित केलेल्या **Problems in Education** या पुस्तकांतील पृष्ठ १०९–११० वर आपल्या प्राथमिक शिक्षणावरील लेखांत म्हणतात,

"This arrangement, because of the easy and undesirable infiltration of local politics, proved more a curse than a boon. It appeared to be a mockery of the principle of decentralization. The easiest victims of

these local bodies, where the educated as well as the uneducated the educated being very few—vied with another for power, were the helpless primary teachers. Their services were commandeered for all kinds of purposes to the detriment of their legitimate duties as teachers . . .The primary teachers should be controlled directly by the Education Department, and should be considered as Government servants for all practical purposes. Administration is a matter that should be in the hands of experts, and not in the hands of all kinds of persons "

केवळ एवढीच सुधारणा करून हा मार्गदर्शनाचा प्रश्न सुटणार नाहीं. आजच्या कारभारव्यवस्थेप्रमाणें प्राथमिक सरकारी अधिकारी प्राथमिक शाळांची तपासणी ( Inspection ) करतात. त्यांना मार्गदर्शन का करता येत नाहीं, त्याच्या कारणांची मीमांसा झाली पाहिजे. सर्व कारभार केवळ सरकारकडे देऊन हें घडेल असें नाहीं. या प्राथमिक शिक्षकांना सर्वतोपरी मार्गदर्शन करणारीं केंद्रे म्हणजे प्राथमिक शिक्षण महाविद्यालयें व माध्यमिक शिक्षण महाविद्यालयें हींच होत. शिक्षक व हीं शिक्षणासंबंधीं शिक्षण देणारीं महाविद्यालयें याचा सातत्यानें संबंध कसा राहील, त्यासाठीं कोणत्या उपाययोजना कराव्या लागतील याचा प्रामुख्यानें विचार झाला पाहिजे. आजकाल सर्वत्र चालू असलेल्या शिबिरापेक्षां ( Seminar ) या योजना अधिक काटेकोरपणें आंखाव्या लागतील प्रत्यक्ष अध्यापन करणाऱ्या शिक्षकाला, योग्य अशा कालक्रमानें विशिष्ट अभ्यासक्रम पार पाडावे लागतील, शिक्षकाना प्रत्येक विषयाचें मूल्यमापन ( Evaluation ) कसें करतात याची साद्यंत माहिती करून द्यावी लागेल व या प्रायोगिक कार्यक्रमाला सरकारचा दृष्टिकोणहि अनुकूल असा लागेल. यासंबंधींची सविस्तर चर्चा या ठिकाणीं मांडणें शक्य नाहीं. मी स्पष्ट करीत असलेल्या दृष्टिकोणांतील हा

अपरिहार्य असा भाग आहे व तो जरूर तेवढ्याच विस्तारानें मांडलेला आहे. प्राथमिक शिक्षणाच्या प्रसाराच्या व्यापक पण मूलभूत विषयाशीं इतके धागेदोरे व असे निगडित झालेले आहेत. म्हणूनच त्यांचा विचार एकूण दृष्टिकोणाची मांडणी करीत असतांना करणें अपरिहार्य ठरतें.

न्यून-ते पुरतें

माझा विषय क्षितिजासारखा विस्तृत आणि लपंडाव खेळणारा. त्यानें मला हुलकावण्या दिल्या असतील. पण मी भोज्याकडे नजर ठेवून लपलेले प्रश्न शोधण्याचा यत्न केला आहे प्राथमिक शिक्षणाच्या प्रसारांतील परिचित अडचणींची नामावली मी मुद्दाम दिली नाहीं. आदर्श ग्रंथालय आणि ग्रंथपाल यांचें ज्ञात स्वरूपहि पुन्हां रेखाटण्याचा यत्न केला नाहीं कारण शिक्षणाचा प्रसार गुणवत्तेनें आणि संख्यात्मकतेनें करण्याचें खरें सामर्थ्य शिक्षक आणि त्याच्या हातांत हात घालून जाणारें ग्रंथालय यांतच आहे. ग्रंथालय अंतर्बाह्य समृद्ध करण्याचे व ते ग्रंथ साऱ्या शिक्षकांपर्यंत पोंचविण्याचे प्रयत्न ही आजची खरी निकड आहे. अशा समृद्ध ग्रंथालयाच्या हातीं ज्याचा हात आहे, असा शिक्षकच हें क्रांति-कार्य करूं शकेल. त्याला सामाजिक किंवा सांस्कृतिक कार्य करायचें आहे ते त्याच्या विद्यार्थ्यांच्यासाठीं हें समाजानें ओळखलें पाहिजे, सरकारनें तर पक्कें लक्षात ठेवलें पाहिजे. पण इतकें मात्र खरें कीं, समाजाशीं समवाय ही कल्पना दुरुस्त केलीच पाहिजे. साहित्य आणि प्रकाशन यांचा विचार करीत असतांना, पुरोगामी लोकशाही सरकारची भूमिका कशी व का असावी हे आवश्यक तेवढ्या तपशिलानें सांगितलें आहे.

प्राथमिक शिक्षणाचा प्रसार, ग्रंथालयें आणि साहित्य-प्रकाशन हे विषय एकमेकांशीं निगडित आहेत. साहित्याच्या प्रकाशनाच्या संदर्भात, क्रमिक पुस्तकांचा प्रश्नहि अपरिहार्यतेनें येतो. तद्वतच शिक्षण-प्रसार म्हटला कीं तो ज्यांचा बळावर मुख्यत: करायचा ते शिक्षक आणि

शिक्षणाचा आशय, म्हणजेच अभ्यासक्रम यांचाहि विचार करावा लागतो. व्यक्तीप्रमाणें समाजाचेंहि शिक्षण अखंड चालू असतें, तें चालू ठेवावें लागतें. हें कार्य केवळ शाळांच्यावर व तेथील शिक्षकांवर विसंबून ठेवून चालणार नाहीं. हें ओझें सर्वांनीं वाहिलें पाहिजे. हा गोवर्धन पर्वत सर्वांच्या काठ्यांनीं उचलला गेला पाहिजे. मग तो अव्यक्त जनता-जनार्दन आपल्या करंगळीचें निमित्त पुढें करील व मग सारें लोकजीवन गोकुळासारखें निर्धास्त आणि सुखी होईल.

इतकेंहि करून विवेचनांत न्यून राहिलें असेल, तर आपल्यासारखे समयज्ञ सहचिंतक तें न्यून पुरतें करून घेतील अशी माझी मनोमय श्रद्धा आहे. शिक्षणक्षेत्रांत असे विचारसत्र नेहमींच उपकारक ठरतें. अकाळ-विक्राळ स्वरूपाच्या अज्ञानाच्या, निरक्षरतेच्या तमोयुगाला दूर हटविण्याचें सामर्थ्य आपल्यांतच आहे अशी माझी धारणा आहे. एका हातांत ग्रंथ दुसऱ्या हातीं कृति आणि मनांत अजिंक्य आशावाद घेऊन अध्यापन करणाऱ्या शिक्षकांच्या हातीं आपलीं मुलें निर्धास्तपणें विकसित होतील यालाच मी मूलमंत्र मानतों ! त्याच मूलमंत्रानें आजचें शिक्षणविषयक अश्रद्धेचें पटल दूर होईल.

* * *

(४१) ...लय, ठाणे. स्थळप्रत
क्रमांक 23629 . दि: ...
ग्रंथांक ... नों. दि. 21/10/62

परिशिष्ट

# महाराष्ट्र राज्य शैक्षणिक प्रगति

लोकवस्ती : ३,९५,०४,०००.

शहरांत राहणारे : २७.९ टक्के.

ग्रामीण वस्ती : ७२.१ टक्के.

शहरें : २६९ (सर्वत्र प्राथमिक शाळा आहेत.)

खेडेगांवें : ३५,५०५.

२५,१९९ (प्राथमिक शाळा आहेत.)

५,५८३ (कोणती तरी प्राथमिक शिक्षणाची सोय असलेली)

४,७२३ (प्राथमिक शिक्षणाची सोय नसलेलीं)

साक्षरता : २९.७ टक्के.

४१.८ टक्के पुरुष.

१६.७ टक्के स्त्रिया.

(१९५१ ते १९६१ या काळांत ८.७ टक्क्यांनीं साक्षरता वाढली)

## महाराष्ट्र राज्य प्राथमिक शाळा

| | | | एकूण संख्या |
|---|---|---|---|
| एकूण मुलांच्या शाळा | : | ३३,१८८ | ३४,५९४ |
| ,, मुलींच्या ,, | : | १,४०६ | |
| एकूण मूलोद्योगी शाळा | : | ४,१०० मुलांच्या | |
| | | १४३ मुलींच्या | |
| मूलोद्योगी नसलेल्या शाळा | : | २९,०८८ मुलांच्या. | |
| | | १,२६३ मुलींच्या. | |
| एकूण विद्यार्थ्यांची संख्या | : | २६,८३,१०६ मुलें | ४१,७८,०२४ |
| | | १४,९४,९१८ मुली | |
| ट्रेंड शिक्षक | : | ५२,१७९ पुरुष | ७०,९५६ |
| | | १८,७७७ स्त्रिया | |
| एकूण शिक्षक | : | १,१२,६७२ | |
| एकूण प्राथमिक शिक्षणावर खर्च | : | १५,९९,५९,००० रुपये | |

(१०,९३,७२,००० रुपये सरकारतर्फे खर्च होतात.)

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक शाळा

| | | एकूण संख्या |
|---|---|---|
| एकूण मुलांच्या शाळा : ३१९७<br>एकूण मुलींच्या शाळा : २५५ | | ३४५२ |
| एकूण विद्यार्थ्यांची संख्या : | मुलें ७९८२९३<br>मुली २१०२३३ | १००८५२६ |
| ट्रेंड शिक्षक : | पुरुष १८१०९<br>स्त्रिया ६५९९ | २४७०८ |
| एकूण शिक्षक : | ३३०६८ पुरुष<br>९०५८ स्त्री | ४२१२६ |
| ग्रामीण विभागांतील :<br>माध्यमिक शाळा : | ९७८ मुलांच्या<br>६ मुलींच्या | ९८४ |

एकूण माध्यमिक शिक्षणावर खर्च : १,४७,२७,००० रुपये.

( सरकारतर्फे खर्च होतात )

## महाराष्ट्र-राज्य विद्यापीठें

### एकूण संख्या

* एकूण विद्यापीठें : ४ मुलांसाठीं
१ मुलींसाठीं

एकूण विद्यार्थी : १७,१९९ मुलें
७१७ मुली

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें, स्थळप्रत.
अनुक्रम 33629 वि. निबंध
क्रमांक 9893 नों: दि: 2/10/5

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. 92383
ग्रंथ संख्या

RI FBK-0012343

* कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठाची योजना मागेस्थ आहे.